शिक्षण / आरोग्य / रोजगार / कला /क्रीडा / महिला सक्षमीकरण

# रयत विद्यार्थी विचार मंच

संस्थापक / अध्यक्ष : धम्मराज साळवे

- **कार्यअहवाल : सन २०२३**

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाल्यानंतर देखील आजही एक मोठा वर्ग शिक्षणापासून वंचित आहे.अनेक विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण अर्ध्यावर सोडतात. मराठवाड्यातील एका विद्यार्थीनीने बस पास साठी २५० रूपये नाहीत म्हणून आत्महत्या केली. अनेक विद्यार्थी आपल्या शिक्षणाचे ओझे पालकांवर नको म्हणून शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी अर्ध्यावर शिक्षण सोडतात किंवा आत्महत्या करतात.एवढ्या शुल्लक कारणांसाठी विद्यार्थ्यांनी अर्ध्यावर शिक्षण सोडणे किंवा आत्महत्या करणे हे अतिशय दुर्देवी आहे.आपल्या अवती भोवती अनेक गरजु, होतकरू विद्यार्थी शिक्षणापासुन वंचित राहतात त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणुन शैक्षणिक प्रगल्भ करणे हा देशाच्या विकासाचा पाया आहे. आपण सर्व विद्यार्थी मिळुन आपल्यातील गरजु व होतकरू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन त्यांना सक्षम करूया. याकरिता रयत विद्यार्थी विचार मंच कार्य करत आहे. आपणही या संकल्पनेत सहभाग घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मदतीचा हात पुढे करूया..

- **धम्मराज नवनाथ साळवे**

**संस्थापक / अध्यक्ष**




चला बनू भविष्य जगाचे...
art_bhagyashree





## दिनांक ०३ जानेवारी २०२३
## ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले जयंती

रयत विद्यार्थी विचार मंच संस्था व रमाई मागासवर्गीय संस्था यांच्या वतीने ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी रमाई मागासवर्गीय  संस्थेच्या वतीने रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेला गरजू विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी रोख धनादेश व अनेक महापुरुषांची पुस्तके भेट देण्यात आली..यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे व रमाई मागासवर्गीय संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते...

# निर्भय पत्रकार

दिनांक - ०४-०१-२०२३ | कार्यकारी संपादक- कलिंदर शेख - 7020552424 | www.nirbhaypatrakar.in

## रयत विद्यार्थी विचार मंच व माता रमाई मागासवर्गीय संस्था यांच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती साजरी





( निर्भय पत्रकार )

क्रांतीज्योती सावित्रीमाई जोतीराव फुले या एक भारतीय समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि कवयित्री होत्या. त्यांना भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून ओळखले जाते. आपले पती महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासोबत त्यांनी भारतातील महिलांचे अधिकार सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सावित्रीमाईना भारतीय स्त्रीवादाची जननी मानले जाते. त्यांची ३ जानेवारी रोजी जयंती निमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व माता रमाई मागासवर्गीय संस्था अध्यक्ष सविता ओव्हाळ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले . यावेळी माता रमाई मागासवर्गीय संस्था यांच्यावतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या शैक्षणिक कार्याकरिता रक्कम रुपये २१२१/- (अक्षरी -दोन हजार एकशे एकवीस ) धनादेश व महामानवांचे जीवन कार्यावर आधारित पुस्तके देण्यात आले .

चिंचवड विधानसभेचे आमदार लक्ष्मण भाऊ जगताप यांच्या निधनाने शहरात शोकाकुल परिस्थिती निर्माण झाली त्यांना यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

सदर कार्यक्रमात रयत विद्यार्थी विचार मंच चे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, मावळ प्रमुख अतुल वाघमारे, महासचिव प्रा. विक्रांत शेळके , माता रमाई मागासवर्गीय संस्था अध्यक्ष सविता ओव्हाळ, खजिनदार नितीन ओव्हाळ, उपाध्यक्ष रोहिणी निकम, सहसचिव नलिनी गायकवाड, सल्लागार ललिता लवांडे, सदस्य सुमन भोसले,नीलम ओव्हाळ, पूनम निकम, सुशीला देवकुळे व वीर पदाधिकारी सदस्य उपस्थित होते .

# शहरात सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

**पिंपरी : पुढारी वृत्तसेवा**

पिंपरी- चिंचवड शहरात विविध संस्था, संघटना, शाळा व महाविद्यालयांत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली.

पिंपरीतील सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास विविध पदाधिकाऱ्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच काही सामाजिक संस्थातर्फे महिलांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शाळा महाविद्यालयामध्येदेखील विद्यार्थिनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा करून मनोगत व्यक्त केले. तर काही ठिकाणी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील नाटिका सादर करून त्यांच्या कार्याची महती सांगण्यात आली.

**महात्मा फुले महाविद्यालय**

पिंपरी येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली.



**पिंपरीतील महात्मा फुले महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थित प्राचार्य डॉ. प्रमोद बोत्रे, प्राचार्य डॉ. कैलास जगदाळे आदी.**

या वेळी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य डॉ. प्रमोद बोत्रे उपस्थित होते. तसेच याप्रसंगी प्राचार्य डॉ. कैलास जगदाळे, प्रा. शहाजी मोरे, प्रा. डॉ. भारती यादव, डॉ. मृणालिनी शेखर, प्रा. अनिकेत खत्री, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. नीलकंठ डहाळे आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. बोत्रे म्हणाले की, भारतीय पातळीवर पारंपरिक पुरुषप्रधान मानसिकता असलेल्या समाजव्यवस्थेत सत्याची, न्यायाची आणि मानवतावादाची बीजे पेरण्याचे आणि रुजविण्याचे महान कार्य फुले दांपत्याने केले. विधवा पुनर्विवाह, बालहत्या प्रतिबंधक गृह, केशवपन, अस्पृश्यता निर्मूलन, अनाथाश्रम अशा विविध क्षेत्रात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. महात्मा फुले यांच्या प्रेरणेतून शिक्षण घेऊन भारतातील पहिली स्त्री शिक्षिका होण्याचा मान मिळविला. महिलांसाठी शिक्षक म्हणून कार्य करताना विविध संघर्षांना सामोरे जावे लागले, मात्र त्यावर मात करत कार्य केले. प्लेगसारख्या साथीत रोगी लोकांना जीवदान देण्यासाठी अविरत कार्य करीत सामाजिक बांधिलकी आणि सामाजिक आदर्श निर्माण केला.डॉ. सोनल बावकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विजया पोकळे यांनी आभार मानले.

**रयत विद्यार्थी मंच**

रयत विद्यार्थी विचार मंच व माता रमाई मागासवर्गीय संस्था यांच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी रयत विद्यार्थी विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, मावळ प्रमुख अतुल वाघमारे, महासचिव प्रा. विक्रांत शेळके आदी उपस्थित होते. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास धम्मराज साळवे व सविता ओव्हाळ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. माता रमाई मागासवर्गीय संस्था यांच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई ज्योतिबा फुले यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या शैक्षणिक कार्याकरिता महामानवांचे जीवन कार्यावर आधारित पुस्तके देण्यात आले.

कार्यक्रमात आमदार लक्ष्मण जगताप यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### शहरात आज राष्ट्रवादी काँग्रेसची जनजागर यात्रा

पिंपरी : महागाई, बेरोजगारी, वाढलेला भ्रष्टाचार, भाजपा नेत्यांकडून थोर पुरुषांविषयी केली जाणारी अपमान जनक वक्तव्ये, राज्यातून बाहेर जाणारे उद्योगधंदे या विषयांवरील प्रदेश महिला राष्ट्रवादीची जनजागर यात्रा गुरुवारी (दि.५) शहरात येत आहे. यानिमित्त शहरात कोपरा सभा होणार आहेत. गुरुवारी डिलक्स चौक, पिंपरीत दुपारी तीनला, खंडोबा माळ, आकुर्डीत सायंकाळी साडेचार, गोसावी रुग्णालय, रूपीनगर येथे सायंकाळी सहा वाजता कोपरा सभा होईल. जनजागर यात्रेचा समारोप सभा भोसरीतील पीएमटी चौकात रात्री आठला होईल. यात्रेत खा. सुप्रिया सुळे, प्रदेश महिलाध्यक्षा विद्या चव्हाण, खा. फौजिया खान, प्रदेश निरीक्षक आशा मिरगे, वैशाली नागवडे, शीतल हगवणे यासह शहरातील पदाधिकारी, माजी नगरसेवक व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहे, अशी माहिती शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी दिली.










## दिनांक ०५ जानेवारी २०२३
## संपर्क_कार्यालयाचे_उद्घाटन

रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य संपर्क कार्यालयाचे उद्घाटन पिंपरी विधानसभेचे आमदार मा.अण्णा बनसोडे साहेब व रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांच्या हस्ते करण्यात आले.पिंपरी चिंचवड महानगपालिकेचे विशेष अधिकारी किरण गायकवाड साहेब, निवृत्त पोलीस अधिकारी गुलाम मोहम्मद शेख,काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर उपाध्यक्ष मा.नरेंद्र बनसोडे,Adv.सागर चरण याच्या उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा पार पडण्यात आला.यावेळी मा.आमदार अण्णा बनसोडे साहेब व प्रमुख मान्यवरांनी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या..















## दिनांक ०६ जानेवारी २०२३
## ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले जयंतीनिमित्त
## गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे व्यायामशाळा आनंदनगर,चिंचवड स्टेशन येथील योजक स्टडी सेंटर मध्ये क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिम्मित गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. चिंचवड स्टेशन आनंदनगर येथील झोपडपट्टी भागातील विद्यार्थ्यांना मोफत क्लासेस घेण्याचे कार्य योजक स्टडी सेंटर यांच्या माध्यमातून केले जाते. या सेंटर मध्ये पहिली ते चौथी ३० विद्यार्थी , पाचवी ते सातवी ५४ विद्यार्थी व आठवी ते दहावी ३५ विद्यार्थी शिक्षण घेतात. या 120 विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची गरज होती याकरिता रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने २८ डझन वह्या/ रजिस्टर व १०० पेनाचे २ बॉक्स देण्यात आले..

उपस्थित विद्यार्थ्यांना सावित्रीमाई फुले यांच्या बद्दल माहिती सांगून मार्गदर्शन केले. यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,प्रदेश महासचिव संतोष शिंदे, राज्य समन्वयक श्वेता ओव्हाळ,सहसचिव भाग्यश्री आखाडे,पिंपरी चिंचवड शहराचे अध्यक्ष मयूर जगताप,समाधान गायकवाड,अभिषेक चक्रनारायण,अजय चक्रनारायण तसेच योजक स्टडी सेंटरच्या प्रमुख चैताली बोरोले,ममता भावसार,सना पटेल,अनिता पाखरे उपस्थित होते...

प्रभात

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**पिंपरी, दि. ६ (प्रतिनिधी)** - रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे व्यायामशाळा आनंदनगर येथील योजक स्टडी सेंटरमध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

चिंचवड स्टेशन आनंदनगर येथील झोपडपट्टी भागातील विद्यार्थ्यांना मोफत क्लासेस घेण्याचे कार्य योजक स्टडी सेंटर यांच्या माध्यमातून केले जाते. या सेंटरमध्ये पहिली ते चौथी ३० विद्यार्थी, पाचवी ते सातवी ५४ विद्यार्थी व आठवी ते दहावी ३५ विद्यार्थी शिक्षण घेतात. या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची गरज होती. याकरिता रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने २८ डझन वह्या, रजिस्टर व १०० पेनाचे २ बॉक्स देण्यात आले.

या वेळी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व योजक स्टडी सेंटरच्या प्रमुख चैताली बोरोले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. रयतच्या राज्य समन्व्यक श्वेता ओव्हाळ यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी माहिती दिली. या वेळी प्रदेश महासचिव संतोष शिंदे, राज्य समन्वयक श्वेता ओव्हाळ, सहसचिव भाग्यश्री आखाडे, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मयूर जगताप, समाधान गायकवाड, अभिषेक चक्रनारायण, अनिता पाखरे उपस्थित होते.

दिनांक ०७ जानेवारी २०२३








दिनांक ०७ जानेवारी २०२३

संकल्प बहु उद्देशीय संस्था संचालित संत गजानन इंग्लिश मिडीयम स्कुल  वार्षिक स्नेह संमेलन कार्यक्रमात रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे ,महासचिव संतोष शिंदे ,यावेळी विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.







## दिनांक ०८ जानेवारी २०२३
## ग्रेट भेट मा.संजय आवटे सर ( मुख्य संपादक लोकमत )

जागतिक मराठी अकादमी व डॉ. डी वाय पाटील विद्यापीठ पिंपरी,पुणे आयोजित १८ वे जागतिक मराठी संमेलन पिंपरी येथे लोकमत वृत्तपत्राचे मुख्य संपादक मा.संजय आवटे सर यांच्याशी भेट झाली.आमचे मित्र,कवी Vishal Bhagvan Khondale दादा यांनी संजय आवटे सरांसोबत ओळख करून दिली व त्यांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या कार्याबद्दल सांगितले. मा.संजय आवटे सर यांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेची संकल्पना व व संस्थेच्या कार्य जाणून घेतले..सरांनी संस्थेच्या कामाचे कौतुक केले...













## दिनांक १३ जानेवारी २०२३
## राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त
## गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व बिस्कीट वाटप

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिम्मित कुसगाव बुद्रुक, लोणावळा येथील प्राथमिक शाळेतील पहिली ते सातवीच्या ७५ विद्यार्थी शिक्षण घेतात.हे सर्व विद्यार्थी अतिशय गरीब घरातील आदिवासी पाड्यावरील आहेत.या सर्व ७५ विद्यार्थ्यांना वहीपेन व बिस्कीट वाटप करण्यात आले. यावेळी राजमाता माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व शाळेच्या मुख्याध्यापिका आशा मानकर यांनी पुष्पहार अर्पण केले.

यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे,प्रदेश महासचिव संतोष शिंदे, महाराष्ट्र सहसचिव भाग्यश्री आखाडे ,लोणावळा शहराध्यक्ष प्रणाली कावरे, मावळ तालुका अध्यक्ष अतुल वाघमारे, मावळ महासचिव विक्रांत शेळके, शाळेचे शिक्षक महादेव शेलार,नितीन बोंगळे आदी उपस्थित होते.



।। विद्या विनयेन शोभते ।।

स्थापना : १९५५

जिल्हा परिषद प्राथ. केंद्र शाळा कुसगांव बु. ।।

मु. कुसगांव बु.।।, पो. लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे. - ४१० ४०१.

जावक क्र. :

दिनांक :

दिनांक : 12 जानेवारी २०२३

**धन्यवाद पत्र**

आज दिनांक 12 जानेवारी २०२३ रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून **रयत विदयार्थी विचार मंचच्या** माध्यमातून आमच्या शाळेला ७५ मुलांना शालापयोगी साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले. गरीब विद्यार्थ्यांना मिळालेल्या या साहित्याचा नक्कीच उपयोग होणार आहे.

रयत विदयार्थी विचार मंचाच्या या कार्यास आमच्यातर्फे धन्यवाद व पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा.

धन्यवाद

मुख्याध्यापक

परिषद प्राथ. केंद्र शाळा कुसगांव बु।।

मावळ जि पुणे

## दिनांक १३ जानेवारी २०२३

## शैक्षणिक साहित्य दिल्याबद्दल संस्थेचे मानले आभार

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिम्मित कुसगाव बुद्रुक, लोणावळा येथील प्राथमिक शाळेतील पहिली ते सातवीच्या ७५ विद्यार्थी  रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिम्मित कुसगाव बुद्रुक, लोणावळा येथील प्राथमिक शाळेतील पहिली ते सातवीच्या ७५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य दिल्याबद्दल शाळेच्या वतीने संस्थेचे आभार मानले.







## दिनांक १३ जानेवारी २०२३

## ग्रंथालयाच्या_आवाहनाला_प्रतिसाद

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने ग्रंथालयाकरीता पुस्तके व अन्य वस्तूंचे आवाहन केले होते.या आवाहनाला प्रतिसाद देत सन्माननीय कवी मा.रमेश बुरबुरे यांनी गडचिरोली येथून संस्थेच्या संपर्क कार्यालयाच्या पत्त्यावर पुस्तके पाठवली आहेत त्याबद्दल संस्थेच्या वतीने आपले आभारी आहोत..

MPC NEWS

Home > अन्य बातम्या > **Pimpri News : पिंपरी-चिंचवड महानगरपालिका नोकर भरतीचे आयोजन करण्याबाबत रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे निवेदन**

अन्य बातम्या · 1 MINUTE READ

# Pimpri News : पिंपरी-चिंचवड महानगरपालिका नोकर भरतीचे आयोजन करण्याबाबत रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे निवेदन

AMRUTA MPC NEWS
जानेवारी 18, 2023



**एमपीएस न्यूज : पिंपरी-चिंचवड महानगरपालिका नोकर भरती 2022 आयोजन करण्याबाबत संतोष शिंदे, प्रदेश महासचिव, रयत विद्यार्थी विचार मंच संस्था यांनी विठ्ठल जोशी, उप आयुक्त, (Pimpri News) पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना निवेदन दिले आहे. तसेच हे निवेदन आयुक्त शेखर सिंह व अतिरिक्त आयुक्त -1 प्रदीप जांभळे पाटील यांच्या कार्यालयात दिले आहे.**

शिंदे निवेदनात म्हणतात की पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये विविध पदासाठीची भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या भरतीसाठी संपूर्ण महाराष्ट्रातील उमेदवारांनी अर्ज करून चार-साडेचार महिने उलटून गेले असता अद्याप देखील ही परीक्षा घेण्यात आलेली नाही. महापालिकेकडून प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीमध्ये ऑक्टोंबर महिन्यात परीक्षा घेण्यात येईल असा अंदाज वर्तविण्यात आला होता. परंतु सध्या 2023 मधील जानेवारी महिना सुरू आहे.

**Pimpri News: श्वान संतती नियमन शस्त्रक्रियेसाठी विस्तारीत युनिट, दिवसाला 30 शस्त्रक्रिया होणार**

तरीदेखील महापालिकेकडून कोणत्याही सूचना उमेदवारांना देण्यात आलेल्या नाहीत. उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. कारण आपल्या महापालिकेच्या जाहिराती बरोबरच पुणे महानगरपालिकेची जाहिरात देखील प्रसिद्ध झाली होती. सध्या पुणे महानगरपालिकेची परीक्षा प्रक्रिया पूर्ण होऊन उमेदवारांचे जॉइनिंग देखील आले आहे.

तरी कोणत्या कंपनीमार्फत व केंव्हा हि परीक्षा होणार आहे. याच्या सूचना संबंधित उमेदवारांना कळवाव्यात व ही परीक्षा लवकरात लवकर घ्यावी. अशी मागणी शिंदे यांनी केली आहे.

दिनांक १८ जानेवारी २०२३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने लवकरात लवकर नोकरभरतीचे आयोजन करावे याबाबाबत संस्थेच्या वतीने निवेदन देण्यात आले होते.










## दिनांक १९ जानेवारी २०२३
## संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या संपर्क कार्यालयाला वंचित बहुजन आघाडीचे नेते राज्य उपाध्यक्ष मा.सर्वजीत बनसोडे सर व पुणे शहर प्रवक्ते मा.गौरवभाऊ जाधव यांनी भेट दिली.यावेळी संस्थेच्या नवीन संपर्क कार्यालयास व संस्थेच्या कार्याला शुभेच्छा देत सर्वजित बनसोडे सर व गौरवभाऊ जाधव यांनी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांचा सन्मान केला..तसेच रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या संपर्क कार्यालयाला भेट दिल्याबद्दल सर्वजित बनसोडे सर व गौरवभाऊ जाधव यांना संविधान प्रस्ताविका देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.











## दिनांक २० जानेवारी २०२३

## कवितेचा बादशहा अनंतदादा राऊत यांची संपर्क कार्यालयास भेट

साहित्यिक,कवितेचा बादशाह,म्हणून महाराष्ट्रात प्रसिद्धीच्या शिखरावर असलेले नाव म्हणजे मा.प्राध्यापक अनंतदादा राऊत.दादांनी आज रयत विद्यार्थी विचार मंच संपर्क कार्यालयास भेट दिली.संस्थेच्या पदाधिकारी यांच्यासोबत दादांनी खूप छान चर्चा केली तसेच मार्गदर्शन केले.दादांच्या कवितांची मेजवानी भेटली. दादांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे कार्य अगोदर माहीतच होते आज त्यांनी प्रत्यक्ष संस्थेच्या संपर्क कार्यालयास भेट देऊन ते अधिकरित्या जाणून घेतले व संस्थेच्या कार्यास शुभेच्छा दिल्या... यावेळी प्राध्यापक अनंतदादादा राऊत यांना शॉल,भारतीय संविधान पुस्तिका देऊन संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांनी सन्मान केला.यावेळी कवी विशाल दादा खोंदले,पत्रकार,लेखक कवी निलम पवार तसेच संस्थेचे पदाधिकारी प्रदेश महासचिव संतोष शिंदे,राज्य समन्वयक श्वेता ओव्हाळ,मावळ तालुका प्रमुख अतुल वाघमारे,मावळ तालुका महासचिव प्रा.विक्रांत शेळके अर्पिता शिंदे उपस्थित होते.


















## दिनांक २६ जानेवारी २०२३
## प्रजासत्ताक दिन साजरा

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या महाराष्ट्र राज्य संपर्क कार्यालयासमोर ध्वजारोहण करून प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. पोलिस उपनिरीक्षक मा.सावन वाघमारे साहेब  व संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी पोलिस उपनिरीक्षक मा.सावन वाघमारे तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे आभार प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी मानले..

यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.....







## दिनांक २७ जानेवारी २०२३
## डॉ.माईसाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या द्वितीय पत्नी डॉ.सविता उर्फ माईसाहेब यांची पिंपरी चिंचवड शहरात जयंती साजरी करण्यात आली.डॉ.बाबासाहेब आंबेडकर भिमसृष्टी स्मारक येथे बाबासाहेब यांच्या पुतळयाजवळ डॉ.माईसाहेब आंबेडकर यांची प्रतिमा त्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले व जयंतीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.. यावेळी धम्मराज साळवे सर,संतोष शिंदे,संतोष जोगदंड,मयूर जगताप,अभिषेक चक्रणारायन,निलेश आठवले,अजय चक्रणारायन,सचिन सुर्यवंशी, सिद्धांत निकाळजे उपस्थित होते..











## दिनांक ०६ फेब्रुवारी २०२३
## बुद्ध विहारातून संविधानाचा जागर

त्रिरत्न बुद्धविहार दत्तनगर,चिंचवड यांच्या वतीने संविधानाचे रोज वाचन करण्याच्या स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे.या उपक्रमासाठी त्रिरत्न बुद्ध विहार यांच्या वतीने रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व कायद्याचे विद्यार्थी धम्मराज साळवे सर यांना " संविधान आणि आपण " या विषयावर बोलण्यासाठी निमंत्रित करण्यात आले होते.

तसेच यावेळी मला या ठिकाणी कविता करण्यासाठी विनंती केली. विज्ञानाचे महत्व सांगणारी " कोरोना व्हायरस" ही कविता सादर केली...

आम्हाला या स्तुत्य उपक्रमासाठी बोलवल्याबद्दल राहुल सोनवणे व सर्व बुद्ध विहार सदस्य यांचे खूप खूप आभार..

लोकमत

# शाळा, महाविद्यालय परिसरामध्ये टवाळखोरांच्या टोळक्यांचा उन्माद

## पालकांमध्ये भीती : खराळवाडीतील स्थिती, पोलिसांचा नाही धाक

**परमेश्वर वाव्हळ**

लोकमत न्यूज नेटवर्क

**खराळवाडी** : शहरातील शाळा महाविद्यालय परिसरात फिरस्त्या टोळक्यांचा त्रास होत आहे. काही मुले टोळक्याने शाळा महाविद्यालयाच्या परिसरात उन्माद करीत फिरतात. त्यामुळे पालकांच्या मनामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. एकट्या मुलीला शाळा महाविद्यालयात पाठवायचे कसे? असा सवाल उपस्थित होत आहे.

शाळा परिसरात पोलिसांचा राऊंड म्हणायला असतो. मात्र वेळेवर कोणताही पोलीस या परिसरात फिरकत नाही. म्हणून नेमका राऊंड कुणासाठी आहे, अशी चर्चा पालकांमधून केली जात आहे.शहरात दामिनी पथक स्थापन केले आहे. परंतु, हे पथक फक्त नावापुरते नेमले की काय असा सवालही पालक उपस्थित करत आहेत.



आमच्या शाळेत महिन्यात तीन चार दामिनी पथकाचे पोलीस कर्मचाऱ्यांचे राऊंड होत असतात. तसे रजिस्टर सुरक्षारक्षकांच्या कॅबिनला ठेवलेले आहे. त्यामुळे पोलिसांच्या दहशतीने टवाळखोर हुल्लडबाजी करणारे टोळकं शाळेच्या गेटवर फिरत नाहीत. त्यामुळे सर्व शाळेचे वातावरण मुलींसाठी महिलांसाठी सुरक्षित व व्यवस्थित आहे.

**- एन. के. भोये**, मुख्याधापक, खराळवाडी माध्यमिक विद्यालय



शाळा महाविद्यालय परिसरात टवाळखोरांच्या टोळक्यांचा बंदोबस्त करण्यासाठी कुणाला ही न घाबरता शाळा महाविद्यालय गेटवर येऊन सुरक्षा रक्षकांना धमकावणे शिक्षकांना अरेरावीची भाषा करणे मुलींची छेड काढणे मुलांना दम देणे शाळा महाविद्यालय परिसरात पोलिस पेट्रोलिंग गस्त वाढवावी, विशेष पोलीस पथकाची मागणी केली आहे.

**-धम्मराज साळवे**, संस्थापक अध्यक्ष, रयत विद्यार्थी विचार मंच

### प्राधिकरणामध्ये टवाळखोरांनी शोधली नवी जागा

१ प्राधिकरण : प्राधिकरण भागात ज्या नामांकित शिक्षण संस्था आहेत, तेथील व्यवस्थापनाच्या कडक धोरणामुळे विद्यार्थ्यांना हुल्लडबाजीला अडथळा येतो, तसेच या भागातील अप्पुघर उद्यानात सुरक्षारक्षक अटकाव करतात.

२ म्हणून कॉलेज व शाळा क्लास बंक करणारे रोमिओंचा मोर्चा सेक्टर २६ लगत नवीन रावेत रिंगरोड प्राधिकरण नवीन रेल्वे उड्डाण पुलाच्या परिसरात असतो. हा अद्यापी वाहतुकीस सुरु न झाल्याने या परिसरात दुपारच्या वेळेत फारशी वर्दळ नसते.

३ येथून जवळच पीसीईटी तसेच डी. वाय. पाटील, सेंट उर्सुला, म्हाळसाकांत कॉलेज व होस्टेलचे विद्यार्थी व इतर भागातील रोडरोमिओ जमा होतात. बाहेरून खाद्यपदार्थ मागवून पार्ट्यांसोबत फोटोग्राफी करीत हुल्लडबाजी चालू असते.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 4 Feb 17, 2023
Powered by: erelego.com

दिनांक १७ फेब्रुवारी २०२३










**दिनांक १९ फेब्रुवारी २०२३**
**छत्रपती शिवाजी महाराज जयंती**
**रक्तदान शिबीर**

रयत विद्यार्थी विचार मंच ( महा.राज्य ) मुंबई,ठाणे कल्याण कार्यकारणी यांच्या वतीने मिलिंदनगर कल्याणपूर्व या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त दिनांक १९ फेब्रुवारी २०२३ रोजी रक्तदान शिबीर राबवण्यात आले.या उपक्रमास रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या सर्व पदाधिकारी यांनी व कल्याण मिलिंदनगर येथील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला..

रक्तदान शिबीर साठी डोंबिवली ब्लड सेंटर आरोग्य कर्मचारी यांनी सहकार्य केले.डोंबिवली ब्लड सेंटरच्या माध्यमातून जमा झालेले ब्लड यासाठी प्राथमिकता ही गरोदर स्त्रियांना दिली जाते.डोंबिवली ब्लड सेंटर यांनी केलेले सहकार्य व ते त्यांच्या सेंटरच्या माध्यमातून करत असलेले कार्य याकरिता रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने आरोग्य कर्मचारी यांचा भारतीय संविधानाची प्रास्ताविक देऊन सन्मान करण्यात आला.

























## दिनांक १९ फेब्रुवारी २०२३
## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिम्मित
## दहावी बारावी विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन व परीक्षा_किट_वाटप

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच (महा.राज्य) मुंबई,कल्याण,ठाणे कार्यकारणी यांच्या वतीने मिलींदनगर कल्याणपूर्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे दहावी व बारावी विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन व परीक्षा किट वाटप करण्यात आले

यावेळी प्रमुख पाहुणे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,प्रदेश सचिव अमर मुनेश्वर,नवी मुंबई अध्यक्ष सागर गायकवाड,मावळ तालुका अध्यक्ष विक्रांत शेळके,मावळ तालुका महासचिव विक्रांत शेळके,पिंपरी चिंचवड शहर सचिव अभिषेक चक्रनारायन,अजय चक्रनारायन उपस्थित होते

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोमनाथ पाटील (कल्याण तालुका अध्यक्ष) ,रोहित सोनवणे(मुंबई प्रदेश अध्यक्ष),हर्षल सोनवणे(ठाणे जिल्हा अध्यक्ष),निखिल उबाळे (मुंबई प्रदेश उपाध्यक्ष),सूरज ताजने ( ठाणे जिल्हा सचिव),जयेश जाधव ( कल्याण तालुका उपाध्यक्ष) ऋषिकेश बोढारे (कल्याण तालुका सचिव),संकेत यशवंते (कल्याण तालुका महासचिव),आशुतोष चव्हाण(कल्याण तालूका सदस्य), चेतन ढेंडे (कल्याण तालुका संपर्क प्रमुख) या सर्व पदाधिकारी यांनी मेहनत घेतली .









## दिनांक १९ फेब्रुवारी २०२३
## छत्रपती शिवाजी महाराज जयंती
## अभिवादन

रयत विद्यार्थी विचार मंच आयोजित ठाणे,कल्याण,मुंबई कार्यकारणी यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर व दहावी व बारावी च्या विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन व परीक्षा किट वाटप कार्यक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह मिलिंदनगर कल्याणपूर्व या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाची सुरवात छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून करण्यात आली यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर व सर्व पदाधिकारी यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करण्यात आले.






## दिनांक २५ फेब्रुवारी २०२३
## दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ व परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन

ज्ञानसागर इंग्लिश मिडीयम स्कूल चिखली,पिंपरी,पुणे येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ व परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमास ज्ञानसागर शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांना निमंत्रित करण्यात आले होते.यावेळी संस्थापक अध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांना करिअर संदर्भात व परीक्षेसंदर्भात अभ्यास कसा करावा याबद्दल मार्गदर्शन केले.

ज्ञानसागर शाळेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले...

# अनधिकृत शाळांवर कारवाईची मागणी

**पिंपरी, दि. २७ (प्रतिनिधी) -** शहरातील अनधिकृत शाळांवर त्वरीत कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचने महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून शहरातील अनधिकृत शाळांची यादी जाहीर झाली आहे. त्यातील सहा शाळा बंद करण्यात आल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे. उर्वरीत शाळा मात्र, शासनाची परवानगी न घेता राजरोसपणे सुरू आहेत. शिक्षण विभागाच्या वतीने दरवर्षी शाळा चालू झाल्यानंतर या शाळांना केवळ नोटीस बजावली जाते. अनधिकृत शाळांना वारंवार सूचना करूनही अनधिकृत शाळा सुरु ठेवण्यात येत आहेत. पालिकेच्या शिक्षण विभागाकडे कारवाई करायची सोडून अनधिकृत शाळांना सूचना का करत आहेत? असा प्रश्न उपस्थित केला आहे. ८ दिवसात कारवाई न झाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व प्रदेश महासचिव संतोष शिंदे आदी उपस्थित होते.

# शाळांवर कारवाई करण्याची रयत विचार मंचची मागणी

**पिंपरी, ता. २७ :** महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून शहरातील अनधिकृत शाळांची यादी जाहीर करण्यात आली आहे. मात्र, त्यांच्यावर कारवाई अद्याप केलेली नाही, अशा शाळांवर कारवाई करण्याची मागणी रयत विद्यार्थी विचार मंचाने केली आहे. याबाबत संस्थेचे संस्थापक धम्मराज साळवे व प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, 'सरकारची कोणतीही परवानगी न घेता या शाळा राजरोसपणे चालवल्या जातात.

शिक्षण विभागाच्या वतीने दरवर्षी शाळा चालू झाल्यानंतर या शाळांना केवळ नोटीस बजावली जाते. मात्र, अनाधिकृत शाळांच्या वतीने या नोटीसला केराची टोपली दाखवली जाते. त्यानंतर मात्र वर्षभ या शाळा चालू राहतात शिक्षण विभाग देखील पुढील शैक्षणिक वर्ष येईपर्यंत शांत राहतो. गेली अनेक वर्ष या शाळांवर ठोस अशी कारवाई होत नाही.'

महाईन्यूज
संस्थापक, संपादक : श्री. अनिरुद्ध दिघे-पाटील
epaper.mahaenews.com
28 Feb 2023 - Page 1

# अनधिकृत शाळांना 'कुलूप' कधी?

## »प्रशासनाची केवळ बघ्याची भूमिका: विद्यार्थी- पालकांच्या भावनांशी खेळ





।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड महाराष्ट्र शासनाची कोणतीही परवानगी न घेता राजरोसपणे चालवल्या जाणाऱ्या शिक्षण संस्थांवर कधी कारवाई होणार? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. शिक्षण विभागाच्या वतीने दरवर्षी शाळा चालू झाल्यानंतर या शाळांना केवळ नोटीस बजावली जाते. मात्र अनधिकृत शाळांच्या वतीने या नोटीसला केराची टोपली दाखवली जाते. त्यानंतर मात्र वर्षभर या शाळा चालू राहतात व शिक्षण विभाग देखील पुढील शैक्षणिक वर्ष येईपर्यंत चिडीचूप राहतो. गेली अनेक वर्ष या शाळांवर ठोस अशी कारवाई होत नाही. त्यामुळे अशा बेकायदा शाळा कोणाच्या आशिर्वादाने सुरू आहेत, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.**

पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून शहरातील अनधिकृत शाळांची यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये ज्ञानराज माध्यमिक शाळा (काळभोरवाडी), मॉडर्न पब्लिक स्कूल (रहाटणी), मास्टर केअर इंग्लिश स्कूल (भोसरी), सेंट मीरा इंग्लिश स्कूल (चिखली), एस. एस. स्कूल फॉर किड्स (सांगवी), साई स्कूल ऑफ एक्सलेन्स (पिंपळे सौदागर), सेंट रोझरी इंग्लिश मिडीयम स्कूल (चिखली), नाने इंग्लिश स्कूल (राजवाडेनगर, काळेवाडी) यातील ६ शाळा बंद करण्यात आल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले आहे. मात्र, काही शाळांमध्ये नवीन वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

### कायदा काय सांगतो?

» महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या या ढिसाळ कारभारामुळे अनधिकृत शाळांची कुरघोडी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पालकांची आर्थिक लूट करणे, विद्यार्थी पालकांना त्रास देणे असे अनेक प्रकार या अनधिकृत शाळेमध्ये घडतात. शासन निर्णयानुसार बालकांचा मोफत मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क अधिनियम २००९ च्या कलम १८(५) नुसार १ लाख दंड आकारणी करण्याची तरतूद आहे व त्यानंतर देखील सदर शाळा बंद न केल्यास शासन निर्णयानुसार दर दिवशी १० हजार रुपये दंड मारण्याची व शाळा संचालकावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तरतूद आहे.

### ...अन्यथा पुन्हा उपोषण

» शिक्षण खाते अनधिकृत शाळांवर एवढी मेहरबानी का दाखवत आहे? असा प्रश्न आहे. गेल्या अनेक महिन्यापासून आम्ही शिक्षण उपसंचालकाकडे अनधिकृत शाळांवर कारवाई करण्याबाबत प्रस्ताव ठेवला आहे असे सांगून शिक्षणाधिकारी दिशाभूल करत आहेत का ? शिक्षण अधिकाऱ्यांना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्याची चिंता वाटत नाही का ? अनधिकृत शाळांमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक नुकसानीला

### अधिकाऱ्यांची बोटचेपी भूमिका...

स्वराज विद्यार्थी विचार मंच

» महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे कारवाई करण्याचे संपूर्ण अधिकार असतानाशिक्षण अधिकारी अनधिकृत शाळांना कारवाई करायचे सोडून सूचना का करत आहेत हेच समजत नाही ? स्वराज विद्यार्थी विचार मंच संस्था दिनांक १२ ऑगस्ट २०२२ पासून अनधिकृत शाळेच्या विरोधात पत्रव्यवहार करत आहे. तसेच, दि. १९ ऑक्टोबर २०२२ रोजी एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. त्यावेळी शिक्षण अधिकारी यांनी येऊन उपोषण सोडण्यास सांगितले व तात्काळ या शाळांवर कारवाई करणार असल्याचे आश्वासन दिले. पण, उपोषण करून ४ महिने होत आले कायदेशीर गुन्हा अथवा प्रति दिवस १० हजार रुपये दंड अशी कोणतीही कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. शिक्षण विभाग आमच्या कोणत्याही पत्राला उत्तर देत नाही.

### जबाबदार कोण ?

» कृपया आपण याबाबत तात्काळ लक्ष घालावे व कारवाई करावी. ८ दिवसात कारवाई न झाल्यास आम्ही परत पाककरणी अमर उपोषण करणार याची नोंद घ्यावी, असा इशारा स्वराज विद्यार्थी विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे आणि प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी दिला आहे.



दिनांक २८ फेब्रुवारी २०२३

नवराष्ट्र

**शैक्षणिक** • रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेची मागणी

# अनधिकृत शाळांवर कारवाई करा

पिंपरी, (वा.) पिंपरी चिंचवड शहरातील अनाधिकृत शाळांवर त्वरीत कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेतर्फे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्याकडे करण्यात आली आहे. हे निवेदन रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांच्या वतीने देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून शहरातील अनाधिकृत शाळांची यादी जाहीर करण्यात आली आहे.

त्यात ज्ञानराज माध्यमिक शाळा (कासारवाडी), मॉडर्न पब्लिक स्कुल (रहाटणी), मास्टर केअर इंग्लिश स्कुल (भोसरी), ग्रँट मीरा इंग्लिश स्कूल (चिखली), एस. एस. स्कूल फॉर कि* (सांगवी), साई स्कूल ऑफ एक्सलेन्स (पिंपळे सौदागर), सेंट रोझरी इंग्लिश मिडीयम स्कुल (चिखली), माने इंग्लिश स्कुल (राजवाडेनगर, काळेवाडी) या शाळांचा समावेश आहे.

यातील ६ शाळा बंद करण्यात आल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले आहे.

रयत विद्यार्थी विचार मंच संस्था १२ ऑगस्ट २०२२ पासून अनाधिकृत शाळेच्या विरोधात पत्रव्यवहार करत आहे. तसेच १९ ऑक्टोबर २०२२ रोजी एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले यावेळी शिक्षण अधिकारी यांनी येऊन उपोषण सोडण्यास सांगितले व तात्काळ या शाळांवर कारवाई करणार असल्याचे आश्वासन दिले. उपोषण करून ४ महिने होत आले कायदेशीर गुन्हा अथवा प्रति दिवस १० हजार रुपये दंड अशी कोणतीही कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. शिक्षण विभाग कोणत्याही पत्राला उत्तर देत नाही. यावर ८ दिवसात कारवाई न झाल्यास आम्ही परत याप्रकरणी अमर उपोषण करणार आहे, असा इशारा दिला आहे.

## नोटीसला केराची टोपली

शासनाची कोणतीही परवानगी न घेता या शाळा राजरोसपणे चालवल्या जातात शिक्षण विभागाच्या वतीने दरवर्षी शाळा चालू झाल्यानंतर या शाळांना केवळ नोटीस बजावली जाते मात्र अनाधिकृत शाळांच्या वतीने या नोटीसला केराची टोपली दाखवली जाते. शासन निर्णयानुसार बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क अधिनियम २००५ च्या कलम २८(५)नुसार १ लाख दंड आकारणी करण्याची तरतूद आहे व त्यांनतर देखील सदर शाळा बंद न केल्यास शासन निर्णयानुसार दर दिवशी १० हजार रुपये दंड मारण्याची व शाळा संचालकावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तरतूद आहे. मात्र शिक्षण अधिकारी संजय नाईकडे यांनी असे मत व्यक्त केले आहे कि अनधिकृत शाळांना वारंवार सूचना करूनही अनधिकृत शाळा सुरु ठेवण्यात येत असल्याचे स्पष्ट झाले आहे," महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे कारवाई करण्याचे संपूर्ण अधिकार असताना शिक्षण अधिकारी अनाधिकृत शाळांना कारवाई करायचे सोडून सूचना का करत आहेत हेच समजत नाही?

रयत विद्यार्थी विचार मंच

Pune Plus Edition
01 March 2023 Page No. 4
epaper.navarashtra.com



# नवभारत

**मांग** | शहर के अनाधिकृत स्कूलों की सूची घोषित होने के बावजूद टालमटोल

## अनाधिकृत स्कूलों पर कार्रवाई को लेकर उदासीनता

### मनपा के अपर आयुक्त प्रदीप जांभले पाटिल से की गई मांग

■ **पिंपरी,** ब्यूरो. रयत विद्यार्थी विकास मंच ने पिंपरी चिंचवड़ शहर में अनधिकृत स्कूलों के खिलाफ कानूनी कार्रवाई करने की मांग मनपा के अपर आयुक्त प्रदीप जांभले पाटिल से की है. इस बारे में संस्था के संस्थापक अध्यक्ष धम्मराज सालवे व प्रदेश महासचिव संतोष शिंदे की ओर से ज्ञापन दिया गया है.इसमें यह आरोप भी लगाया गया है कि मनपा का शिक्षा विभाग अनाधिकृत स्कूलों के खिलाफ कार्रवाई करने में टालमटोल का रवैया अख्तियार किये हुए है.कार्रवाई की मांग के लिए संस्था ने 8 दिनों का अल्टीमेटम देकर अनशन पर जाने की चेतावनी दी है.

ज्ञापन में कहा गया है कि पिंपरी चिंचवड़ मनपा के शिक्षा विभाग द्वारा शहर के अनधिकृत स्कूलों की सूची घोषित की गई है.इनमें ज्ञानराज माध्यमिक स्कूल (कासारवाडी), मॉडर्न पब्लिक स्कूल (रहाटनी), मास्टर केयर इंग्लिश स्कूल (भोसरी), ग्रांट मीरा इंग्लिश स्कूल (चिखली), एस. एस स्कूल फॉर कि (सांगवी), साई स्कूल ऑफ एक्सीलेंस (पिंपले सौदागर), सेंट रोज़री इंग्लिश मीडियम स्कूल (चिखली), माने इंग्लिश स्कूल (राजवाडे नगर, कालेवाड़ी) शामिल हैं. शिक्षा विभाग की ओर से कहा गया है कि इनमें से 6 स्कूलों को बंद कर दिया गया है. हालांकि इन अनाधिकृत स्कूलों के खिलाफ कोई कानूनी कार्रवाई नहीं की गई है.

### हर साल स्कूल खुलने के बाद ही नोटिस

ये स्कूल बिना सरकार की अनुमति के चलाए जा रहे हैं. शिक्षा विभाग इन स्कूलों को हर साल स्कूल खुलने के बाद ही नोटिस जारी करता है.सरकार के निर्णय के अनुसार निःशुल्क एवं अनिवार्य बाल शिक्षा का अधिकार अधिनियम, 2005 की धारा 28(5) के अनुसार एक लाख जुर्माना लगाने का प्रावधान है तथा यदि उक्त विद्यालय को बन्द नहीं किया जाता है तो हर रोज 10 हजार रुपये का जुर्माना लगाने का प्रावधान है.हालांकि, शिक्षा अधिकारी संजय नाइकडे का कहना है कि यह स्पष्ट है कि अनधिकृत स्कूल बार-बार नोटिस के बावजूद खुले रखे जा रहे हैं.जबकि शिक्षा विभाग के पास ऐसे स्कूलों के खिलाफ कार्रवाई करने का अधिकार है.फिर समझ नहीं आ रहा कि शिक्षा अधिकारी कार्रवाई करने के बजाय अनाधिकृत स्कूलों को निर्देश क्यों दे रहे हैं? यह सवाल भी रयत विद्यार्थी विकास मंच ने उठाया है.

Pune Edition
01-march-2023 Page No. 5
epaper.enavabharat.com

## दिनांक ०१ मार्च २०२३

पिंपरी चिंचवड शहरातील अनाधिकृत शाळेंवर कारवाईची मागणी







दिनांक ०३ मार्च २०२३

सकाळ इन जे.एस.पी.एम राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च कमिटी कॉलेज अध्यक्ष सुमेध ठाणांबीर आणि टीम यांनी रयत विद्यार्थी विचार मंच कार्यालयाला सदिच्छा भेट देत रयत च कार्य जाणून घेतले यावेळी त्यांचा सन्मान रयत विद्यार्थी विचार मंच च्या वतीने करण्यात आला.



## दिनांक ०८ मार्च २०२३
## विद्यार्थ्यांचा आरोग्य व जीवन विमा काढणेबाबत.

पिंपरी चिंचवड शहरातील महानगरपालिकेच्या सर्व शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब गरजू कुटुंबातील, झोपडपट्टी भागातील,तसेच मजूर कष्टकरी घरातील असून पैश्या अभावी हे विद्यार्थी महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षण घेतात. परंतु शिक्षण घेत असताना या विद्यार्थ्यांसोबत अपघात होणे, अथवा मृत्युमुखी पडणे अश्या घटना झालेल्या आहेत अश्या विद्यार्थ्यांना सर्व उपचार मोफत असावे व मृत्यू झाल्यास विद्यार्थ्यांच्या परिवाराला आर्थिक मदत व्हावी याकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने विद्यार्थ्यांचा आरोग्य व जीवन विमा काढण्यात यावा यासंदर्भात रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगपालिकेचे आयुक्त मा.शेखर सिंह व अतिरिक्त आयुक्त. १ मा. प्रदीप जांभळे पाटील यांना निवेदन देण्यात आले.

## विद्यार्थ्यांचा आरोग्य, जीवन विमा काढण्याची मागणी

**पिंपरी, दि. ८ (प्रतिनिधी)** - पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळेत गोर-गरीब, झोपडपट्टी भागातील, कष्टकऱ्यांची मुले शिक्षण घेत आहेत. पालिकेच्या शाळा रहदारीच्या ठिकाणी आहेत. शाळा सुटल्यानंतर अथवा मधल्या सुट्टीनंतर हे विद्यार्थी सैरावैरा बाहेर पळत येतात. यामुळे अनेक वेळा अपघात घडण्याची शक्यता असते. पालकांना खाजगी दवाखान्याचे उपचार परवडत नाहीत. विद्यार्थ्यांचा आरोग्य व जीवन विमा असणे अत्यंत गरजेचे असून पालिकेने विमा काढावा, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने करण्यात आली आहे.

याबाबत मंचाच्या वतीने महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, शहरात पालिकेच्या विविध माध्यमांच्या १३६ शाळा असून या शाळांमध्ये ५० हजारच्या आसपास विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्य व जीवनाशी संबंधित विमा प्रश्नावर रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने २०१८ पासून पाठपुरावा करण्यात येत आहेत. तेंव्हापासून केवळ आश्वासन दिले जात आहे. अद्याप विद्यार्थ्यांच्या विमा पॉलिसी संदर्भात कोणताही निर्णय झालेला नाही. पालिका कर्मचाऱ्यांच्या विविध पॉलिसी काढते. परंतु पालिकेच्या शाळेत शिक्षणाच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत मागणी करून देखील दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप मंचाच्या वतीने करण्यात आला आहे.

दिनांक ०९ मार्च २०२३









## दिनांक १९ मार्च  २०२३
## अश्वघोष पुरस्कार 2023

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या माध्यमातून  गेली ०५ वर्ष विद्यार्थी व शैक्षणिक चळवळीत काम करत असलेले  महाराष्ट्र महासचिव संतोष शिंदे  यांच्या कार्याची दखल घेत अश्र्वघोष आर्ट अँड कल्चरल फौंडेशन व श्रावस्ती बहुउद्देशीय संस्था कोल्हापूर यांच्या माध्यमातून शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार मा.राजू शेट्टी साहेब यांच्या हस्ते मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.






## दिनांक १९ मार्च २०२३

## संस्थेच्या वतीने मालाड जळीतग्रस्त विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याची मदत

मालाड,अप्पापाडा,मुंबई येथे १३ मार्च २०२३ रोजी लागलेल्या आगीत जवळपास साडेचार हजार कुटुंबाची लोकवस्ती अक्षरशः जळून खाक झाली. जयाताई सत्यभामा अंकुश बनसोडे ताईंनी सोशल मीडियावर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्याच्या मदतीसाठी आवाहन केले होते त्या आवाहनाला प्रतिसाद देत रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने मालाड येथील विद्यार्थ्यांसाठी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने ६० डझन वह्या व विद्यार्थ्यांसाठी बूट जयाताईंकडे सुपूर्त केले.तसेच त्यांच्या या चांगल्या कार्यासाठी त्यांचा सन्मान करण्यात आला.





## दिनांक १९ मार्च २०२३

## शैक्षणिक प्रश्नांसाठी बार्टीचे महासंचालक यांची_भेट

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर व प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्थेचे महासंचालक मा.सुनील वारे सर यांची भेट घेऊन त्यांना महासंचालकपदी नियुक्ती झाल्याबद्दल शुभेच्छा देऊन पुढील प्रश्नांवर चर्चा करून निवेदन सादर केले.

- बाबासाहेबांचे सर्व साहित्य_ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध व्हावे
- आझाद मैदानावर मागील ३५ दिवसापासून आंदोलनास बसलेल्या ८६१ विद्यार्थ्यांना सरसकट फेलोशिप मंजूर होणेबाबत
- BANRF २०१९-२० च्या एमफील संशोधक विद्यार्थ्यांना पीएचडीसाठी सलग पाच वर्ष फेलोशिप मिळणे बाबत

लोकमत

# बाबासाहेबांचे साहित्य ऑनलाइन उपलब्ध व्हावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्व साहित्य ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध व्हावे, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांना याबाबत निवेदन देण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शासनाच्या वतीने प्रकाशित होणाऱ्या साहित्याला मागणी आहे. परंतु बार्टी संस्थेकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्व साहित्य एकाच वेळी उपलब्ध नसते. वाचकांना जे अपेक्षित आहे ते साहित्य अथवा पुस्तके न मिळता बार्टी संस्थेकडे जे उपलब्ध साहित्य आहे तेच घ्यावे लागते. यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्व साहित्य ऑनलाइन स्वरूपात वाचकांना एका क्लिकवर वाचण्यास उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर वेबसाइटची निर्मिती करण्यात यावी. मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलनास बसलेल्या ८६१ विद्यार्थ्यांना सरसकट फेलोशिप मंजूर करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून केली आहे.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 4 Mar 31, 2023
Powered by: erelego.com




दिनांक २९ मार्च २०२३

सलाम संविधान महाजलसाचे प्रमुख,महाराष्ट्राचे युवा गायक,संगीतकार कबीर दादा नाईकनवरे व त्यांचे सहकारी जय दादा यांनी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या कार्यालयाला भेट देऊन अनेक विषयांवर चर्चा केली.यावेळी त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.











## दिनांक ०३ एप्रिल २०२३
## तृतीयपंथी ओळख दिन साजरा

तृतीय पंथी व्यक्तीना सुप्रीम कोर्टाने 'तिसरे लिंग' म्हणून २०१४ मध्ये मान्यता दिली. त्यामुळे 'इतर / तृतीयलिंगी व्यक्ती म्हणून कायदेशीर रित्या वैध मार्गाने जीवन जगता येऊ लागले. या निमित्ताने महाराष्ट्र सरकार तर्फे तृतीय पंथी ओळख सप्ताह पाळला जातो.

यानिमित्ताने रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने व रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेच्या सहकार्याने जागतिक तृतीयपंथी ओळख दिन साजरा करण्यात आला.काळेवाडी नढे नगर येथील रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेच्या संपर्क कार्यालयात या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. तृतीयपंथी बांधवाना समाज मान्यता नसताना देखील परिस्थितीशी संघर्ष करत प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तृत्ववाचा ठसा उमटवणाऱ्या तृतीयपंथी बांधवांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

तृतीयपंथी बांधव आर्थिक सक्षम व्हावे याकरिता बचत गटाची स्थापना करणाऱ्या तृतीयपंथी सामाजिक कार्यकर्ता 'दलजीत सिंग' यांचा यावेळी शाल गुलाबपुष्प,देऊन विशेष सन्मान करण्यात आला.तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत सुरक्षा रक्षक म्हणून काम करणाऱ्या सिद्धी कुंभार व रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेच्या माध्यमातून तृतीयपंथी बांधवांच्या सक्षमीकरणाकरिता सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थेच्या उपाध्यक्ष रितिका परमार, सदसय- रिद्धी जाधव, आरोही राठोड, रोहिणी मोरे, गायत्री थेरगावकर यांचा देखील सत्कार करण्यात आला.

यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, राज्य समन्वयक श्वेता ओव्हाळ,सहसचिव भाग्यश्री आखाडे,पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मयूर जगताप, रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रामा भोरकडे,खजिनदार निलेश पवार,सचिव सिद्धी कुंभार,उपाध्यक्ष रितिका परमार,तृतीयपंथी सामाजिक कार्यकर्ता 'दलजीत सिंग' सदसय- रिद्धी जाधव, आरोही राठोड, रोहिणी मोरे, गायत्री थेरगावकर हे उपस्थित होते.

# निर्भय पत्रकार

• दिनांक – ०५-०४-२०२३ • कार्यकारी संपादक- कलिंदर शेख - 7020552424 • www.nirbhaypatrakar.in


## रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्था व रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने जागतिक तृतीयपंथी ओळख दिन साजरा.





( प्रतिनिधी,अल्ताफ शेख )

तृतीय पंथी व्यक्तीना सुप्रीम कोर्टाने 'तिसरे' लिंग म्हणून २०१४ मध्ये मान्यता दिली. त्यामुळे 'इतर' तृतीयलिंगी व्यक्ती म्हणून कायदेशीर रित्या वैध मार्गाने जीवन जगता येऊ लागले.या निमित्ताने महाराष्ट्र सरकार तर्फे तृतीय पंथी ओळख सप्ताह पाळला जातो. या निमित्ताने रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने व रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेच्या सहकार्याने जागतिक तृतीयपंथी ओळख दिन साजरा करण्यात आला. काळेवाडी नढे नगर येथील रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेच्या संपर्क कार्यालयात या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. तृतीयपंथी बांधवाना समाज मान्यता नसताना देखील परिस्थितीशी संघर्ष करत प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तृत्ववाचा ठसा उमटवणाऱ्या तृतीयपंथी बांधवांचा शाल, गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला व मिठाई वाटप करून आनंद साजरा करण्यात आला.

तृतीयपंथी बांधव आर्थिक सक्षम व्हावे याकरिता बचत गटाची स्थापना करणाऱ्या तृतीयपंथी सामाजिक कार्यकर्ता दलजीत सिंग' यांचा यावेळी शाल गुलाबपुष्प, देऊन विशेष सन्मान करण्यात आला. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत सुरक्षा रक्षक म्हणून काम करणाऱ्या सिद्धी कुंभार व रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेच्या माध्यमातून तृतीयपंथी बांधवांच्या सक्षमीकरणाकरिता सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थेच्या उपाध्यक्ष रितिका परमार, सदसय- रिद्धी जाधव, आरोही राठोड,रोहिणी मोरे, गायत्री थेरगावकर यांचा देखील सत्कार करण्यात आला.

यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी असे मत व्यक्त केले कि २०१४ साली कोर्टाने तृतीयपंथी बांधवांना तिसरे लिंग म्हणून मान्यता देत असताना समाजाकडून देखील त्यांना आपलंस करणारा बंधुत्वाचा हात दिला गेला पाहिजे. रयत विद्याथी विचार मंच संस्थेच्या वतीने आपुलकीचा हात देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहे.

यावेळी रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. रामा बोरखडे यांनी असे मत व्यक्त केले कि तृतीयपंथी बांधवाना समाजात प्रतिष्ठा मिळावी त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्या याकरिता आमची संस्था कार्य करते व या तृतीयपंथी बांधवांच्या सक्षमीकरणासाठी रयत विद्यार्थी विचार मंच सारख्या संस्था पुढाकार घेत आहेत हि स्वागताहार्य बाब आहे.

यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, राज्य समन्वयक श्वेता ओव्हाळ, सहसचिव भाग्यश्री आखाडे,पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मयूर जगताप,रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रामा भोरकडे, खजिनदार निलेश पवार, सचिव सिद्धी कुंभार, उपाध्यक्ष रितिका परमार, तृतीयपंथी सामाजिक कार्यकर्ता 'दलजीत सिंग' सदसय- रिद्धी जाधव, आरोही राठोड, रोहिणी मोरे, गायत्री थेरगावकर हे उपस्थित होते.









● बातमी व जाहिराती करीता संपर्क: ७०२०५५२४२४ / ८६६८५००९८० ●

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त एक वही, एक पेन उपक्रम

**पिंपरी, दि. ४ (प्रतिनिधी)** - रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त वही, पेन व शैक्षणिक साहित्य अर्पण करून वैचारिक अभिवादन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर भीमसृष्टी स्मारक, पिंपरी येत्या १४ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजल्यापासून हे अभियान दिवसभर राबवण्यात येणार आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील सर्व आंबेडकरी अनुयायांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी येताना हार, फुले न आणता वही,पेन, शैक्षणिक साहित्य अर्पण करून वैचारिक अभिवादन करावे. या अभियानाअंतर्गत जमा झालेले शैक्षणिक साहित्य महाराष्ट्रातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत दिले जाते, अशी माहिती मंचाचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी दिली.

दिनांक ०५ एप्रिल २०२३

# 'बार्टी' चे उपकेंद्र पिंपरी चिंचवड शहरात आणण्यासाठी पाठपुरावा करा...

Posted By: news pcmc on: April 11, 2023
In: ठळक घडामोडी, पिं चिं शहर व उपनगर वार्ता No Comments
Print Email




**न्यूज पीसीएमसी नेटवर्क**

**पिंपरी (दि. ११ एप्रिल २०२३) :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिटयूट (बार्टी) चे उपकेंद्र पिंपरी चिंचवड शहरात आणण्यासाठी पाठपुरावा करावा, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार २२ डिसेंबर १९७८ रोजी समता विचारपीठाची स्थापना करण्यात आली. संस्थेची कार्यक्षमता वाढवण्यासाठी ऑक्टोबर २००८ च्या शासन निणार्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यास स्वायत्त संस्था म्हणून मान्यता देण्यात आली आहे. या संस्थेचा मुख्य उद्देश संशोधन व प्रशिक्षण आणि सामाजिक समता वृद्धिंगत करण्यासाठी शैक्षणिक उपक्रम, संमेलने, व्याख्याने, परिसंवाद, आयोजित करणे आणि सामाजिक समता या तत्वप्रणाली चा अभ्यास विविध ठिकाणी संस्थेचे उपकेंद्र सुरु करणे आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही नावीन्यपूर्ण व चांगल्या उपक्रमासाठी देशभर एक आदर्श महानगरपालिका म्हणून ओळखली जाते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून बार्टीचे मुख्यसंचालक यांच्याशी पत्रव्यवहार करून पिंपरी चिंचवड शहरात बार्टीचे उपकेंद्र शहरात सुरु करण्यासाठी पत्रव्यवहार करावा. बार्टीच्या वतीने अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवले जातात. पिंपरी चिंचवड शहरात अनुसूचित जाती जमाती विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी पुणे शहरात जावे लागते. बार्टी उपकेंद्राच्या माध्यमातून अनुसूचित जाती जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी केंद्रीय व राज्य स्तरीय स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन केंद, तसेच सर्व महामानवाचे जीवन चरित्र, समतावादी विचाराचे साहित्य वाचकांसाठी उपलब्ध होईल .

पिंपरी चिंचवड शहरात शिक्षणाबरोबरच संशोधन, प्रशिक्षण व सामाजिक तत्व प्रणालीचा विकास होणे गरजेचे आहे. पिंपरी चिंचवड शहर हे ज्ञानाचे केंद्र बनण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिटयूट (बार्टी) या संस्थेचे उपकेंद्र शहरात सुरु करणे गरजेचे आहे. जेणेकरून शहरातील विद्यार्थी, युवक, शासकीय कर्मचारी, लेखक व साहित्यिक यांना साहित्याचे एक नवीन दालन सुरु होईल, असे या निवेदनात रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी म्हटले आहे.

दिनांक ११ एप्रिल २०२३

बार्टी चे उपकेंद्र पिंपरी चिंचवड शहरात सुरु करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली.




रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्था
Ramatritiyapanthi Dakshta Social Foundation
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
यांच्या १३२ व्या
जयंती निमित्त
महामानवाला भव्य पुष्पहार अर्पण करून
अभिवादन
अध्यक्ष रामा सुरेश भोरकडे


वही पेन संकलन कक्ष
रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्था
Ramatritiyapanthi Dakshta Social Foundation
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
यांच्या १३२ व्या
जयंती निमित्त
महामानवाला भव्य पुष्पहार अर्पण करून
अभिवादन
अध्यक्ष रामा सुरेश भोरकडे



दिनांक १४ एप्रिल २०२३

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेच्या वतीने पिंपरी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला तृतीयपंथी बांधवांकडून पुष्पहार अर्पण करण्यात आले..

तसेच रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने जयंतीनिमित्त एक वही एक पेन अभियान राबवण्यात येते या अभियानाला संस्थेकडून शैक्षणिक साहित्य ५०० वह्या ५०० पेन व ५०० पेन्सिल देण्यात आल्या..

यावेळी रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेचे अध्यक्ष श्री रामा भोरकडे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे श्री किरण गायकवाड साहेब विशेष अधिकारी, रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, राज्य समन्वयक श्वेता ओव्हाळ, गुन्हेशोध मराठी मासिकचे सहसंपादक मीनाक्षी घोडके , रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेचे खजिनदार निलेश पवार,सचिव सिद्धी कुंभार,उपाध्यक्ष रितिका परमार,तृतीयपंथी सामाजिक सदसय- रिद्धी जाधव, आरोही राठोड, रोहिणी मोरे, हे उपस्थित होते.

े. यावेळी पंजाब मोंडे, ासाहेब सुबंध प्रामुख्याने स्थित होते. अभिवादन स्थळी न्या नागरिकांनी या पाणप- ा लाभ घेतला. याच बरोबर वरण संरक्षण गतिविधितर्फे ा घर उपक्रमाची प्रदर्शनी ण्यात आली होती.

## मनसेतर्फे डॉ.आंबेडकर जयंती

भारतीय राज्यघटनेचे ्पकार डॉ. बाबासाहेब ेडकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्र नवनिर्माण सेना पिंपरी- ्वड शहर तर्फे पुष्पहार अर्पण ्न अभिवादन करण्यात े. या वेळी शहरअध्यक्ष ्न चिखले, उपशहरअध्यक्ष ाळा दानवले, विभाग अध्यक्ष देवतराले, विद्यार्थी सेना ्क्ष अनिकेत प्रभु, वाहतुक ा शहरअध्यक्ष, सुशांत ्वी, नितीन सुर्यवंशी, निलेश ्, प्रतिक शिंदे, मयुर हजारे, भालेराव, राजेश अवसरे, ा वाघमारे, विकी मनसे, सकट, मनसैनिक उपस्थित

## ीयपंथी संस्थेच्या वतीने ॅ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



• भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेच्या वतीने पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला तृतीयपंथी बांधवांकडून पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या राबविण्यात आलेल्या 'एक वही एक पेन अभियाना'ला संस्थेकडून शैक्षणिक साहित्य ५०० वह्या, ५०० पेन व ५०० पेन्सिल देण्यात आल्या.

यावेळी रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रामा भोरकडे, खजिनदार निलेश पवार, सचिव सिद्धी कुंभार, उपाध्यक्ष रितिका परमार, महापालिकेचे अधिकारी किरण गायकवाड, रयत विद्यार्थी विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, राज्य समन्वयक श्वेता ओव्हाळ, मीनाक्षी घोडके, रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेचे सदस्य रिद्धी जाधव, आरोही राठोड, रोहिणी मोरे आदी उपस्थित होते.

रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेच्या वतीने सामाजिक कार्य करणाऱ्या सर्व तृतीयपंथीयांचा महापालिकेच्या वतीने किरण गायकवाड यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.












दिनांक १४ एप्रिल २०२३

एक वही एक पेन अभियान २०२३

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिम्मित रयत विद्यार्थी विचार मंच व भारतीय बौद्धजन विकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर भिमसृष्टी स्मारक येथे एक वही एक पेन अभियान राबवण्यात आले.









## दिनांक १४ एप्रिल २०२३

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे_वाटप

रयत विद्यार्थी विचार मंच सातारा जिल्हा यांच्या वतीने  पश्चिम महाराष्ट्र प्रभारी अध्यक्ष अक्षय चव्हाण व सातारा जिल्हा महासचिव अक्षय सुतार यांनी कराड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते..







## दिनांक १६ एप्रिल २०२३
## एक वही एक पेन अभियान

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व त्यागमुर्ती माता रमाई स्मारक समितीच्या सदस्यांच्या वतीने एक वही एक पेन अभियानाला प्रतिसाद देत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या संपर्क कार्यालयाला भेट देऊन शैक्षणिक साहित्य दिले त्याबद्दल आपले खूप खूप आभार...

# रामा तृतीयपंथी संस्थेतर्फे महामानवास अभिवादन

**सांगवी, दि. १५ (वार्ताहर)** - रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेच्या वतीने पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला तृतीयपंथी बांधवांकडून पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या राबविण्यात आलेल्या 'एक वही एक पेन अभियाना'ला संस्थेकडून शैक्षणिक साहित्य ५०० वह्या, ५०० पेन व ५०० पेन्सिल देण्यात आल्या.

या वेळी रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रामा भोरकडे, खजिनदार नीलेश पवार, सचिव सिद्धी कुंभार, उपाध्यक्ष रितिका परमार, महापालिकेचे अधिकारी किरण गायकवाड, रयत विद्यार्थी विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, राज्य समन्वयक श्वेता ओव्हाळ, मीनाक्षी घोडके, रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेचे तृतीयपंथी सामाजिक सदस्य रिद्धी जाधव, आरोही राठोड, रोहिणी मोरे उपस्थित होते.

रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेच्या वतीने सामाजिक कार्य करणाऱ्या सर्व तृतीयपंथीयांचा पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने किरण गायकवाड यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन संस्थेला व तृतीयपंथी बांधवांचा सन्मान करण्यात आला.

लोकमत

# एक वही, पेन अभियानाला केली मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेच्या वतीने आंबेडकर यांच्या पुतळ्याला तृतीयपंथी बांधवांकडून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

तसेच रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या राबविण्यात आलेल्या 'एक वही एक पेन अभियाना'ला संस्थेकडून शैक्षणिक साहित्य देण्यात आले.

यावेळी रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रामा भोरकडे, खजिनदार नीलेश पवार, सचिव सिद्धी कुंभार, उपाध्यक्ष रितिका परमार, महापालिकेचे अधिकारी किरण गायकवाड, रयत विद्यार्थी विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे, राज्य समन्वयक श्वेता ओव्हाळ, मीनाक्षी घोडके, रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेचे तृतीयपंथी सामाजिक सदस्य रिद्धी जाधव, आरोही राठोड, रोहिणी मोरे आदी उपस्थित होते.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 4 Apr 16, 2023
Powered by: erelego.com

दिनांक १६ एप्रिल २०२३






## दिनांक १८ एप्रिल २०२३
## ग्रेट भेट केशव वाघमारे सर

विचारवंत,लेखक,सामाजिक कार्यात सातत्याने कार्यशील असणारे केशव_वाघमारे सर व त्यांचे सर्व सहकारी यांनी कामानिमित्त पिंपरी येथील रयत विद्यार्थी विचार मंच संपर्क कार्यालयाला भेट दिली.यावेळी त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना भारतीय संविधानाची प्रास्ताविका देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला..






## दिनांक २० एप्रिल २०२३
## रक्तदान शिबीर

कालकथीत किशोरभाऊ गाडे युवा मंच कालकथीत धम्मपाल कांबळे मित्र परिवार कंपाऊंड बॉईज, महाराष्ट्र छावा प्रतिष्ठाण यांचे संयुक्त विद्यमाने महामानव भारतरत्न' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती निमित्त अभिवादन करण्यासाठी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले.





















**दिनांक ०१ मे २०२३**

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने **महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करुन ,सफाई व सुरक्षा कर्मचारी कामगार यांना मिठाई वाटप व गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला..

विशेष उपस्थिती- पोलीस उपनिरीक्षक गुळीग साहेब

**विशेष सहकार्य- रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्था**

# सफाई कर्मचाऱ्यांना मिठाईचे वाटप

**सांगवी, दि. २ (वार्ताहर)** - रयत विद्यार्थी विचार मंच व रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेच्या वतीने महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त सफाई व सुरक्षा कर्मचारी, कामगार यांना मिठाई वाटप व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

एच. ए. येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पिंपरी येथील पुतळ्याला रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, रामा तृतीयपंथी दक्षता समितीचे उपाध्यक्ष निलेश पवार, तृतीयपंथी सुरक्षा रक्षक सिद्धी कुंभार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सफाई कर्मचाऱ्यांचा गुलाबपुष्प व मिठाई देऊन सत्कार करण्यात आला.



**पिंपरी : रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने सफाई आणि सुरक्षा कर्मचारी कामगारांना मिठाई वाटप करण्यात आली.**

चिंचवड विधानसभा संघटक सतीश दरेकर, युवती अध्यक्ष वर्षा जगताप, ओबीसी सेल अध्यक्ष विजय लोखंडे, सेवादल सेल अध्यक्ष महेश झपके, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष संजय औसरमल, व्यवस्थापन सेल अध्यक्ष अकबर मुल्ला, कामगार सेल अध्यक्ष किरण देशमुख, महिला वरिष्ठ कार्याध्यक्ष कविता खराडे, अर्बन सेल अध्यक्ष दत्तात्रेय जगताप, अर्बन सेल महिला अध्यक्ष मनीषा गटकळ, ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष सचिन औटे, उद्योग व्यापार सेल अध्यक्ष विजयकुमार पिरंगुटे, युवक प्रदेश सरचिटणीस प्रशांत सपकाळ उपस्थित होते.

## हुतात्म्यांना अभिवादन

भोसरी एमआयडीसी येथे फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन व हिंदुस्तान माथाडी ट्रान्स्पोर्ट व जनरल कामगार सेनेतर्फे कामगार बंधूंचा आणि भगिनींचा सन्मान करण्यात आला. भोसरी एमआयडीसीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र निकाळजे यांच्या हस्ते संयुक्त महाराष्ट्रात चळवळीत सहभागी हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले. भोसरी एमआयडीसी याबद्दल संपर्क कार्यालय येथे अध्यक्ष अभय भोर उपस्थित होते. निकाळजे यांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

## सफाई आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांचा सन्मान

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त सफाई व सुरक्षा कर्मचारी कामगारांना मिठाई वाटप करत सन्मान केला. एच. ए. मधील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पिंपरीतील पुतळ्याला संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे , पोलिस उपनिरीक्षक गुळीग साहेब, नीलेश पवार, तृतीयपंथी सुरक्षा रक्षक सिद्धी कुंभार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केला. यावेळी प्रदेश महासचिव संतोष शिंदे, सदस्य नीलेश आठवले, संघटक अजय चक्रनारायण, सहसचिव सचिन सूर्यवंशी तसेच रामा तृतीयपंथी दक्षता सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष/खजिनदार नीलेश पवार, सचिव सिद्धी कुंभार, उपाध्यक्ष रितिका परमार, सहसचिव आरोही राठोड, सदस्य रोहिणी मोरे उपस्थित होते.

# रॅली, कॅन्डल मार्च, ध्वजारोहणाद्वारे महाराष्ट्र दिन उत्साहात

**पिंपरी : पुढारी वृत्तसेवा**
**पिंपरी चिंचवड शहरात महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त शाळा, महाविद्यालये, संस्था, संघटना व विविध राजकीय पक्षांतर्फे विविध कार्यक्रम घेण्यात आले. बहुतांश ठिकाणी रॅली, कॅन्डल मार्च, ध्वजारोहण, साहित्य वाटप यांनी महाराष्ट्र दिन साजरा केला.**

**श्री सरस्वती विद्यालय**

आकुर्डी येथील नवनगर शिक्षण मंडळाच्या श्री सरस्वती माध्य. व उच्च माध्य. विद्यालय व कीर्ती विद्यालय संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रगीताचे सामुदायिक गायन केले. तसेच ध्वज प्रतिज्ञेची शपथ घेण्यात आली.

याप्रसंगी नवनगर शिक्षण मंडळाचे संस्थापक सचिव प्रा. गोविंद दाभाडे, प्राचार्या साधना दातीर, मुख्याध्यापक राजू माळे व उपप्राचार्य विजय बच्चे, पर्यवेक्षक प्रदीप काळोखे, कोकिळा आहेर, संतोष कुंभार उपस्थित होते.

या वेळी सर्व शिक्षकांनी महाराष्ट्रगीताचे सामुदायिक गायन केले. कैलास पोंदे यांनी उपस्थितांना ध्वज प्रतिज्ञेची शपथ दिली.

शैला दौंडकर यांनी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या विषयी महिती देऊन हौतात्म्य पत्करलेल्या १०५ शहिदांना अभिवादन केले.

**यशस्वी शिक्षण संस्था**

यशस्वी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशस्वी प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, यशस्वी इंग्लिश मीडियम स्कूल, यशस्वी बालक मंदिरमध्ये संस्थेचे सचिव डॉ. तुषार देवकाते यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष देवकाते यांनी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा इतिहास आपल्या मनोगतामधून सांगितला. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शोभा देवकाते यांनी सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सर्व विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व राज्यगीत गायन केले.

**रयत विद्यार्थी मंच**

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त सफाई व सुरक्षा कर्मचारी कामगार याना मिठाई वाटप करत सन्मान करण्यात आला

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या एच. ए. येथील पुतळ्याला व कामगारांचे नेते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पिंपरी येथील पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय गुळींग, निलेश पवार, तृतीयपंथी सुरक्षारक्षक सिद्धी कुंभार आदी उपस्थित होते.



महापालिका भवनाच्या आवारात ध्वजारोहण करताना आयुक्त शेखर सिंह.

**महाराष्ट्र मजदूर संघटना**

महाराष्ट्र मजदूर संघटनेतर्फे चिंचवडच्या केएसबी चौकात कामगारभूषण स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करीत अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी शिवसेना उपनेते इरफान सय्यद, महाराष्ट्र मजदूर संघटनेचे कार्याध्यक्ष परेश मोरे, भिवाजी वाटेकर, प्रविण जाधव, पांडुरंग कदम,पांडुरंग काळोखे, अप्पा कौदरे, सर्जेराव कचरे, सतीश कंठाळे, श्रीकांत मोरे आदी उपस्थित होते.

इरफान सय्यद म्हणाले की, कोणत्याही समाजाच्या आणि देशाच्या विकासात कामगारांची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे. अंगात ताकद असेपर्यंत कामगार काम करायचे. आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना कोणतीही सामाजिक सुरक्षा नव्हती. आवश्यक सुविधा, पुरेसे वेतन, आरोग्य सुविधा, सामाजिक सुरक्षिततेच्या मागणीसाठी माथाडी कामगारांनी साठच्या दशकात संघर्षाला सुरुवात केली. कामगारांना त्यांचे हक्क आणि सामाजिक सुरक्षा देण्यासाठी अण्णासाहेब पाटील यांनी नेटाने लढा देऊन माथाडी कायद्याचे जनक ठरले त्यामुळेच आज माथाडी कामगार वर्ग सुरक्षित जीवन जगतोय.

## महापालिकेतर्फे महाराष्ट्र दिन साजरा

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच, अण्णासाहेब मगर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. 'माझी वसुंधरा' अभियात स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.

या वेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे, जितेंद्र वाघ, उल्हास जगताप व विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. माझी वसुंधरा अभियान स्पर्धेतील विद्यापीठ व महाविद्यालय गटात निगडी येथील पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरींगने प्रथम क्रमांक मिळविला. या संघाला ४१ हजारांचे बक्षीस देण्यात आले. तर, चिंचवड येथील प्रतिभा कॉलेज ऑफ एज्यूकेशनने द्वितीय क्रमांक मिळविला. त्या संघास ३१ हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला.

नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. विजेते रणजीत शानबाग यांना ४१ हजार रुपये, उपविजेते अरुण दीक्षित यांना ३१ हजारांचे बक्षीस देण्यता आले. तर, तृतीय क्रमांक शरद संकपाळ व पंकज इंगळे यांना विभागून देण्यात आला.

## भारतीय जैन संघटना

भारतीय जैन संघटना माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुणवंत कामगार अण्णा जोगदंड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अण्णा जोगदंड यांनी आपल्या भाषणातून कामगारांच्या समस्या व सध्याची परिस्थिती याचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी शिकून खूप मोठे व्हावे व विद्यालयास विसरू नये असा संदेश त्यांनी दिला. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य दिलीपकुमार देशमुख, उपप्राचार्य डॉ. राजेंद्र कोकणे, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय जाधव आदी उपस्थित होते. या वेळी संघटनेच्या माध्यमिक विद्यालयातील एन एम एम एस परीक्षेत मेरिटमध्ये आलेल्या अनुष्का गोरडे, वैभव मेंगडे व भाग्यश्री हरळय्या या दोन विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक अविनाश यादवाडकर, सुनीता पांडकर, संतोष नाईकनवरे, मयूर मरळ यांचाही सन्मान करण्यात आला.
या प्रसंगी विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दिनांक ०२ मे २०२३**
**महाराष्ट्र व कामगार दिन**








दिनांक ०२ मे २०२३

रयत शिक्षण संस्थेच्या पिंपरी येथील महात्मा फुले महाविद्यालयात माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्यात मनोगत व्यक्त करताना धम्मराज साळवे सर

# शिक्षण विभागातून शिक्षकांच्या तक्रारी आणि बदलीचे प्रस्ताव गायब..

Posted By: news pcmc on: May 08, 2023
In: ठळक घडामोडी, पिं चिं शहर व उपनगर वार्ता No Comments
Print Email



- **पालिकेचा शिक्षण विभाग झालायं निष्क्रिय…**

**न्यूज पीसीएमसी नेटवर्क**

**पिंपरी (दि. ०८ मे २०२३) :- शिक्षण विभागात शिक्षण अधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यापासून संपूर्ण शिक्षण विभाग निष्क्रिय झाला आहे. शिक्षण विभागात कसल्याही प्रकारचा ताळमेळ दिसून येत नाही. शिक्षण अधिकारी हे शिक्षण विभागात फार कमी वेळा उपलब्ध असतात. त्यांच्या या गैरहजेरीचा फायदा घेत शिक्षण विभागातील अधिकारी कर्मचारी यांना कोणाची कसल्याही प्रकारची भीती राहिली नाही. तसेच शिक्षण अधिकारी यांचा वचक शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर दिसून येत नाही.**

शिक्षण विभागात तक्रार घेऊन आलेल्या तक्रारदारांना तासनतास ताटकळत वाट बघत बसावे लागते, शिक्षण विभागात केलेल्या तक्रारी अर्जावर कोणतीही कारवाई होत नाही. शहरात अनाधिकृत शाळा बंद करण्याची वारंवार मागणी करून देखील अनधिकृत शाळा बंद होत नाहीत. खाजगी शाळांच्या मुजोरीबाबत कोणतीही कारवाई केली जात नाही. तक्रारी अर्ज गुप्त राहत नाही. त्याची माहिती बाहेर दिली जाते. शिक्षण विभागातील लिपिक सातत्याने गैरहजर असतो. पर्यायी लिपिक दिला जात नाही.

तसेच एका पदवीधर शिक्षकाने पदोन्नतीसाठी चार वेळा विनंती अर्ज केला होता परंतु शिक्षण विभागातून त्या अहवालातील नस्ती गायब झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. हे प्रकरण ताजे असतानाच एका प्राथमिक शाळेतील शिक्षिकेचाही छेडछाड प्रकरणातील चौकशी समितीचाही अहवाल गहाळ झाल्याची माहिती समोर आली आहे. शिक्षकांच्या तक्रारी आणि बदलीचे प्रस्ताव गायब होत आहेत याला केवळ लिपिक जबाबदार नसून शिक्षण अधिकारी देखील तेवढेच जास्त जबाबदार आहेत. अश्या पद्धतीने तक्रारी व नस्ती गायब होणे यामागे काही आर्थिक हितसंबंध नाहीत ना याची चौकशी होणे गरजेचे आहे. त्यामुळे आपण केवळ लिपिकांना दोषी न ठरवता शिक्षण अधिकारी यांच्यावर देखील फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करावा व शिक्षण विभाग सुरक्षित राहावा याकरिता तात्काळ शिक्षण विभागात CCTV कॅमेरे बसवण्यात यावेत, अशा मागणीचे निवेदन रयत विद्यार्थी विचार मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे व प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी वतीने महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त १ यांना दिले आहे.



युवापर्व न्यूज

Home / महाराष्ट्र

महाराष्ट्र शैक्षणिक समाजकारण

## पिंपरी-चिंचवड मनपा शिक्षणाधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करा – रयत विद्यार्थी विचार मंच

युवापर्व न्यूज · May 9, 2023 · 0 · 677

1 minute read

**पिंपरी-चिंचवड(युवापर्व) :** शिक्षण विभागात शिक्षण अधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यापासून संपूर्ण शिक्षण विभाग निष्क्रिय झाला आहे. शिक्षण विभागात कसल्याही प्रकारचा ताळमेळ दिसून येत नाही. शिक्षण अधिकारी हे शिक्षण विभागात फार कमी वेळा उपलब्ध असतात.त्यांच्या या गैरहजेरीचा फायदा घेत शिक्षण विभागातील अधिकारी कर्मचारी यांना कोणाची कसल्याही प्रकारची भीती राहिली नाही.तसेच शिक्षण अधिकारी यांचा वचक शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर दिसून येत नाही.

दिनांक ०९ मे २०२३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातून शिक्षकांच्या बदली व बदलीचे प्रस्ताव गायब झाल्याप्रकरणी संस्थेच्या वतीने पालिका आयुक्त यांच्याकडे शिक्षण अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली









## दिनांक १३ मे २०२३
## लीडर माता मेळावा

प्रथम एज्युकेशन फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित लीडर माता मेळावा कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक रयत विद्यार्थी विचार मंच महाराष्ट्र राज्य अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी उपस्थित पालकांना मार्गदर्शन केले व निपुण माता पालक बक्षीस वितरण व कुशल विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले यावेळी प्रथम समन्वयक ललिता भंडारे ,प्रथम समनव्यक वैशाली मोरे,ललिता कांबळे ,रयत विद्यार्थी विचार मंच चे प्रदेश महासचिव संतोष शिंदे ,समनव्यक श्वेता ओव्हाळ ,नेते महेंद्र सरवदे ,शरदाताई मुंडे उपस्थित होते.

# प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनकडून मातांचा गौरव



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहर प्रथम एज्युकेशन फाउंडेशन आणि टीएचएसएन यांच्या संयुक्त विद्यमाने भोसरी क्वालिटी सर्कल येथे माता पालक यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी रयत विद्यार्थी मंचचे संस्थापक धम्मराज साळवे, बालाजीनगरचे सामाजिक कार्यकर्ते महेंद्र सरवदे, सामाजिक प्रबोधनकार शारदा मुंडे, प्रथम संस्थेच्या महाराष्ट्र समन्वयक वैशाली मोरे, शहर समन्वयक ललिता भंडारे आदी उपस्थित होते. या सर्वांच्या हस्ते सन्मानचिन्ह म्हणून ट्रॉफी देऊन माता पालकांचे कौतुक करण्यात आले. यावेळी माता पालकांपैकी प्रिया गाडे व मिरा हतागळे यांनी आपले अनुभव सांगितले. त्याच बरोबर मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

दोन्ही संस्थांच्या वतीने बालाजीनगर व बौध्दनगरमधील तीन ते आठ वयोगटातील मुले व त्यांचे माता-पालक यांच्यासाठी पालक शिक्षण हा उपक्रम राबविला जातो. त्याच वस्तीतील चार ते पाच माता-पालक तयार करून त्यांचा एक गट तयार करून त्या गटाला एक लीडर माता नेमण्यात येते. त्यांना संस्थांमार्फत साहित्य दिले जाते. प्रत्येक गटांना दर आठवड्याला आयडिया व्हिडीओ कार्ड पाठवले जाते. तसेच मुलांसाठी वर्कशीट व काही साहित्य दिले जाते. दर आठवड्याला माता गटात बसून आयडिया कार्डवर क्रियाकृती करतात. तसेच मुलांकडून करून घेतात.

या उपक्रमांमुळे मुलांमध्ये व पालकांमध्ये चांगला बदल झाला आहे. मातांचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यांचे संभाषण कौशल्य वाढले आहे. मुले व माता-पालक यांच्यातील संवाद वाढला आहे. गटात बसण्याची सवय लागली. यामुळे मुलांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली आहे.



## दिनांक १३ मे २०२३
## कार्यक्षम विद्यार्थी नेतृत्व पुरस्कार

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांना २०१५ पासून रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी करत असलेल्या शैक्षणिक कार्याची दखल घेत निर्मिक फाऊंडेशन यांच्या वतीने जयंती महामानवांची खेड,चाकण या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमात मा.क्रांतीताई खोब्रागडे ( सहाय्यक आयुक्त.आयकर विभाग पुणे ) माजी समाजकल्याण आयुक्त EZ खोब्रागडे साहेब ,RPI नेते विनोद निकाळजे यांच्या हस्ते कार्यक्षम_विद्यार्थी_नेतृत्व_पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

## धम्मराज साळवे यांचा कार्यक्षम विद्यार्थी नेतृत्व पुरस्काराने गौरव

**पिंपरी :** निर्मिका फाऊंडेशनच्या वतीने रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांना शैक्षणिक कार्याबद्दल कार्यक्षम विद्यार्थी नेतृत्व पुरस्कार २०२३ देऊन सन्मानित करण्यात आले.

चाकण येथे हा कार्यक्रम झाला. रयत विद्यार्थी विचार मंच संस्था शैक्षणिक क्षेत्रात २०१५ पासून कार्यरत आहे. संस्थेच्या माध्यमातून गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करणे, शैक्षणिक समस्या सोडवणे, करिअर मार्गदर्शन करण्याचे कार्य केले जाते. याच शैक्षणिक कार्याची दखल घेत रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांना निर्मिका फाऊंडेशनच्या वतीने आयकर विभागाचे सहाय्यक आयुक्त क्रांती खोब्रागडे, माजी समाजकल्याण आयुक्त खोब्रागडे यांच्या हस्ते कार्यक्षम विद्यार्थी नेतृत्व पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी निर्मिका संस्थेचे अध्यक्ष हरीश देखणे, आरपीआयचे नेते विनोद निकाळजे आदी उपस्थित होते.


CITY PLUS मराठी

न्यूज

वेद नव्या बातमीचा...

सिटी प्लस मराठी

सोमवार दिनांक - १५/५/२०२३. बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 9764656990


## रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांचा नेतृत्व पुरस्कार 2023 देऊन गौरव

पिंपरी | रयत विद्यार्थी विचार मंच संस्था शैक्षणिक क्षेत्रात 2015 पासून कार्यरत आहे. संस्थेच्या माध्यमातून गरीब गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करणे, शैक्षणिक समस्या सोडवणे, करिअर मार्गदर्शन करणे , अश्या प्रकारचे कार्य केले जाते.(Chakan) याच शैक्षणिक कार्याची दखल घेत रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांना सन्मानित करण्यात आले.

निर्मिक फाऊंडेशन अध्यक्ष हरीश देखणे यांच्या वतीने जयंती महामानवाची निमित्ताने अध्यक्ष धम्मराज साळवे यांना कार्यक्षम विद्यार्थी नेतृत्व पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. (Chakan) खेड,चाकण या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमात पुणे आयकर विभागाच्या सहाय्यक आयुक्त मा.क्रांतीताई खोब्रागडे, माजी समाजकल्याण आयुक्त विनोद निकाळजे, निर्मिक फाऊंडेशन अध्यक्ष हरीश देखणे आदी उपस्थित होते.



**दिनांक १५ मे २०२३**





## दिनांक ३१ मे २०२३
## महानगरपालिका प्रशासनाचे आभार

यापूर्वी पिंपरी चिंचवड शहरातील महानगरपालिकेच्या शाळा चालू झाल्यानंतर देखील २ ते ३ महिने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य पुस्तके मिळत नव्हती.याकरिता मागील २ वर्षात दरवर्षी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने आंदोलन देखील करण्यात आले होते.परंतु यावर्षी महानगरपालिका प्रशासनाने शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व पुस्तके मिळतील अश्या पद्धतीने उत्तम नियोजन केले आहे. रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी या साहित्याची पाहणी केली.महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना यावर्षी वेळेवर शैक्षणिक साहित्य मिळणार यामुळे समाधान वाटते..



# मासुळकर नेत्र रुग्णालयाचे उद्घाटन झाले, मनुष्यबळाचे काय ?

## वायसीएममधील नेत्ररोग विभाग हलविल्यानंतर दृष्टिहीनांचे हाल : स्वतंत्र मोठी इमारत, पण डॉक्टरांची भासतेय कमतरता

**पिंपरी: महापालिकेच्या वतीने पिंपरीतील मासुळकर कॉलनी येथे नवीन शंकरराव मासुळकर नेत्र रुग्णालयाचे उद्धाटन करण्यात आले. त्यानंतर यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयातील नेत्ररोग विभागाचे या नवीन रुग्णालयात स्थलांतर झाले. परंतु, मनुष्यबळाचा अभाव असल्यामुळे नेत्ररुग्णांना योग्य उपचार मिळत नसून दृष्टिहीनांना देखील अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.**

महापालिकेच्या वतीने १७ एप्रिल २०२३ रोजी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत मोठ्या दिमाखात उद्घाटन झाले. त्यानंतर १९ एप्रिलपासून यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील नेत्ररोग विभागाचे स्थलांतर या नेत्र रुग्णालयात करण्यात आले आहे. येथे सध्या ४० खाटांची सोय केली आहे. टप्पानिहाय ८० खाटांची व्यवस्था केली जाणार आहे. सामान्य नेत्ररोग निदान आणि शस्त्रक्रिया, काचबिंदू निदान शस्त्रक्रिया, पापण्यांचे आजार, मधुमेहाच्या रुग्णांसाठी रेटिना तपासणी व उपचार, डोळ्यांतील दाब वाढल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवरील उपचार, लहान मुलांच्या डोळ्यांची काळजी व बालपणातील अंधत्व याबाबतचे उपचार, दृष्टिहीनांना कमी दृष्टी सहायकाबाबतच्या सुविधा आणि उपचार आदी सेवा नेत्र रुग्णालयामध्ये उपलब्ध करुन देण्याचे सांगितले.मात्र प्रत्यक्षात उद्घाटनानंतर या रुग्णालयात पुरेशे मनुष्यबळ नाही. डॉक्टरांची कमतरता आहे.

त्यामुळे रुग्णांना योग्य सुविधा मिळत नाहीत. येथे बाह्यरुग्ण विभाग व आंतररुग्ण विभाग आणि शस्त्रक्रिया सुरू करण्यात आल्या.

परंतु, साधनसामुग्री व मनुष्यबळाअभावी पूर्ण क्षमतेने सुरू नाही.असे स्पष्ट केले. तसेच, वायसीएम व नेत्र रुग्णालय दोन्हीकडे विभाग सुरू असल्याने योग्य नियोजन होत नाही. दृष्टीहीन यांना सुविधा मिळण्यात अडथळे येत आहेत. महापालिकेकडून योग्य नियोजनाची व चांगल्या उपचार सुविधा देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पंचनामा मनपा रुग्णालयांचा...

● अमोल काकडे

वायसीएम वैद्यकीय महाविद्यालयातील नेत्ररोग विभाग १९ मार्च २०२३ पासून एक तृतीयांश मनुष्यबळ आहे. मनुष्यबळाची समस्या सोडली, तर रुग्णालय कार्यान्वित झालेले आहे. डोळे तपासणी व उपचारासाठी आवश्यक यंत्र व औषधे उपलब्ध आहे. प्रत्येक दिवशी १०० ते १५० रुग्णांची ओपीडी व आपीडीसाठी १५ ते २० रुग्ण दाखल होतात. तसेच आवश्यकतेनुसार शस्त्रक्रिया सुरू करण्यात येत आहेत. नवीन रुग्णालय सुरू केले असले, तरी वायसीएममध्येही नेत्ररोग विभाग कार्यरत आहे. दोन्हीकडे विभाग सुरू असल्यामुळे काही अडचणींना सामोरे जावे लागते. परंतु, सुधारणा करून मार्ग काढण्यात येत आहे.

डॉ. रुपाली महेशगौरी, वैद्यकीय अधिकारी, नेत्र रुग्णालय

महापालिका प्रशासन केवळ इमारती उभ्या करून त्या सुरू झाल्याचे दाखविण्यात आघाडीवर आहेत. अपुऱ्या सुविधांसह मासुळकर कॉलनी येथील नवीन नेत्र रुग्णायाचे उद्घाटन करण्यात आलेले आहे. हा अत्यंत चुकीचा प्रकार आहे. उद्घाटन होऊन देखील या नेत्र रुग्णालयात अपुरे मनुष्यबळ आहे. अनेक तांत्रिक सुविधा नाहीत. त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. त्यामुळे तात्काळ शंभर टक्के सुविधांसह हे नेत्र रुग्णालय कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

संतोष शिंदे, प्रदेश महासचिव, रयत विद्यार्थी विचार मंच

वायसीएम रुग्णालयातून महापालिकेने नेत्ररोग विभाग मासुळकर कॉलीन येथे स्थलांतरित केला. परंतु, हे नेत्र रुग्णालय सुरू केल्यानंतर हेळसांड होत आहे. दृष्टीहीन लोकांची खिल्ली उडविण्याचा हा सगळा प्रकार आहे. दृष्टीदोषाचा त्रास असलेल्या लोकांना योग्य उपचार मिळत नाहीत. उद्घाटन केल्यानंतर देखील येथे सोयी-सुविधा उपलब्ध नाहीत. ओपीडीला डॉक्टर वेळेवर नसतात. महापालिका प्रशासनाला जाब विचारल्यानंतर ते फक्त मनुष्यबळ कमी असल्याचे उत्तर देतात. दिव्यांग प्रमाणपत्र किंवा सुविधांसाठी दृष्टीहीन व्यक्तींना धावपळ करावी लागते. समाज विकास विभागाच्या विविध योजनांसाठी देखील डॉक्टरांकडून तपासणी करून घेणे आवश्यक असते. पण, याचा कोणताही विचार होत नसल्याचा खेद वाटतो.

-संतोष राऊत, सचिव, दृष्टीहीन कल्याण संघ

## दिनांक ०१ जून २०२३

पिंपरी मासूळकर नेत्र रुग्णालयाच्या अपुऱ्या सुविधांबाबत दैनिक पुण्यनगरी मधील प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांची प्रतिक्रिया

## अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

**पिंपरी, दि. १ (प्रतिनिधी) -** रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने राजमाता अहल्याबाई होळकर यांच्या जयंतनिमित्त मोरवाडी येथील पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांच्या हस्ते अहल्याबाई होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी धम्मराज साळवे म्हणाले की, राजमाता अहल्याबाई होळकर या इतिहासातील अत्यंत कर्तबगार महिला राज्यकर्ता होत्या. त्यांनी रूढी, परंपरा झुगारून एक महिला देखील सक्षम, कर्तबगार राज्यकर्ता होऊ शकते याचे आदर्श उदाहरण त्यांनी घालून दिले. अनेक मंदिरे, ऐतिहासिक स्थळे यांचे पुनर्निर्माण करून त्यांनी या राष्ट्राची उभारणी केली. या वेळी सचिव नीरज भालेराव, संघटक रोहित कांबळे, सहसचिव प्रगती कोपरे उपस्थित होते.

दिनांक ०२ जून २०२३

# पालिका शाळेतील विद्यार्थ्यांची बससेवा पूर्ववत सुरू करा

पिंपरी, दि. २ (प्रतिनिधी) - महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना महापालिकेच्या वतीने मोफत बससेवा उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यामुळे दूरवरच्या अंतरावरील शाळेतही विद्यार्थी प्रवास करून जायचे; मात्र ही बस सेवा करोना काळात बंद करण्यात आली. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे मागील शैक्षणिक वर्ष वाया गेले आहे. ही बाब लक्षात घेऊन, यंदाच्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांसाठी मोफत बससेवा पूर्ववत सुरु करण्याची मागणी रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने करण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड शहर हे कामगार व उद्योगनगरी म्हणून ओळखले जाते. राज्यभरातील विविध कानाकोपऱ्यातून मजूर कामगार कामासाठी पिंपरी चिंचवड शहरात येतात.या शहरातील विविध भागातील बांधकाम,मजूर यांच्या शाळाबाह्य विद्यार्थ्यांना अडीच ते ३ किलोमीटर अंतरावर महापालिकेच्या शाळेत जावे लागते. मात्र महापालिकेकडून दिली जाणारी बससेवा बंद असल्याने पालक आपल्या मुलांना चालत शाळेत पाठवण्यासाठी तयार होणार नाहीत. तसेच लहान मुलगा बेपत्ता होण्याच्या भितीने पालक एकट्या विद्यार्थ्याला दुर अंतरावरील शाळेत पाठवत नाहीत. यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू शकतात. त्यामुळे ही बस सेवा परत सुरु झाल्यास ही मुले पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात येऊ शकतील.

## शहरातील मजूर, कामगारांच्या मुलांसाठी घर ते शाळा मोफत बस पुन्हा सुरु करा..

Posted By: news pcmc on: June 02, 2023
In: ठळक घडामोडी, पिं चिं शहर व उपनगर वार्ता, शैक्षणिक
No Comments Print Email




**न्यूज पीसीएमसी नेटवर्क**

**पिंपरी (दि. ०२ जून २०२३) :- पिंपरी चिंचवड शहर हे कामगार व उद्योग नगरी म्हणून ओळखले जाते. राज्यभरातील विविध कानाकोपऱ्यातून मजूर कामगार कामासाठी पिंपरी चिंचवड शहरात येतात. या शहरातील विविध भागातील बांधकाम, मजूर यांच्या शाळाबाह्य विद्यार्थ्यांना अडीच ते ३ किलोमीटर अंतरावर महापालिकेच्या शाळेत जावे लागते. विद्यार्थ्यांची पायपीट लक्षात घेता पिंपरी चिंचवड महापालिकेने विद्यार्थ्यांसाठी मोफत बस सेवा सुरू केली होती. परंतु ही बस सेवा कोरोना काळात बंद करण्यात आली. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे मागील शैक्षणिक वर्ष वाया गेले.**

अगोदरच मजुरी काम करणाऱ्या पालकांची आपल्या मुलांना शिक्षण देण्याची इच्छा नसते. परंतु अनेक सामाजिक संस्थांच्या वतीने त्यांचे समुपदेशन करून त्यांची मानसिकता तयार केली जाते. मात्र महापालिकेकडून दिली जाणारी बससेवा बंद असल्याने पालक आपल्या मुलांना चालत शाळेत पाठवण्यासाठी तयार होणार नाहीत. तसेच लहान मुलांचे बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढले असल्याने पालक एकट्या विद्यार्थ्याला इतक्या लांब शाळेत पाठवत नाहीत. यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू शकतात.

मोफत बस सेवा पुन्हा सुरु झाली तर, रावेत, पुनावळे, किवळे, मोशी, चिखली व शहरातील अन्य भागातील विद्यार्थ्यांना शाळेत जाता येईल. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक हिताचा विचार करून ज्या भागात मोफत बसेसची गरज आहे, अश्या ठिकाणी बस सेवा सुरु करावी, अशा आशयाचे निवेदन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त १ प्रदीप जांभळे पाटील व शिक्षण अधिकारी संजय नाईकडे यांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी दिले आहे.

दिनांक ०३ जून २०२३

पिंपरी चिंचवड शहरातील मजूर कामगारांच्या मुलांना शाळेत जाण्यासाठी बंद केलेली मोफत बससेवा पुन्हा सुरु करण्याची पालिका आयुक्तांकडे मागणी

लोकमत

# 'वायसीएम'मध्ये रुग्णांना मिळते अपमानास्पद वागणूक

## उपचारासाठी गेलेल्या रुग्णांना वॉर्डांमध्ये आढळतात झुरळं

ऑन द स्पॉट

**परमेश्वर वाव्हळ**

लोकमत न्यूज नेटवर्क

**खराळवाडी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात विविध वॉर्डांमध्ये झुरळांचा संचार होत असल्याचे दिसून येत आहे. रुग्णालयात पाचव्या मजल्यावर महिला वॉर्ड क्र. ५०० मध्ये कचरा आढळून आला. वॉर्डामधील शौचालयांचे दरवाजे तुटलेल्या अवस्थेत तर, शौचालय तुंबलेल्या अवस्थेत आढळून आली. तसेच वेगवेगळ्या विभागांमध्ये झुरळांचा मुक्त वावर पाहायला मिळत आहे. या रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकडून मिळणाऱ्या अपमानास्पद वागणुकीमुळे रुग्ण व त्यांचे नातेवाईक पुरते हवालदिल झाले आहेत. असे असताना रुग्णालय प्रशासन मात्र दुर्लक्ष करीत असल्याची रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांची तक्रार आहे.




### वॉर्डांच्या कोपऱ्यात जाळ्या

रुग्णालयात महिला प्रसूती शस्त्रक्रिया विभाग, एक्सरे, सोनोग्राफी या विभागात सर्वत्र झुरळं, तसेच कोपऱ्यात जाळ्या, वॉर्डामधील शौचालयांचे दरवाजे तुटलेल्या अवस्थेत तर, शौचालय तुंबलेल्या अवस्थेत आढळून आली. रुग्णांना पाणी पिण्यासाठी प्रत्येक मजल्यावर कूलरची सुविधा उपलब्ध नाही. औषधांची सुविधा नाही. पुरेसे बेड नसल्याने एका बेडवर दोन-दोन रुग्ण उपचार घेत असलेले पाहायला मिळाले.



डॉक्टर वगळता अन्य कर्मचारी रुग्ण आणि नातेवाइकांसोबत व्यवस्थित बोलत नाहीत, तसेच औषधे आणण्यासाठी बाहेर पाठविले जाते. रुग्णांच्या बेडवर झुरळं फिरताना दिसतात. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे.

**-नितेश दखणे,** रुग्णांचे नातेवाईक, चाकण.



यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील विविध वॉर्डांमधील शौचालयाची अत्यंत वाईट अवस्था आहे. तेथे साफसफाई होत नाही. यामुळे रुग्णांचे व नातेवाइकांची गैरसोय होत आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे.

**- संतोष शिंदे,** सामाजिक कार्यकर्ते.



रुग्णालयातील गैरसोयींबाबत संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात येतील. वॉर्डातील सर्व ठिकाणी स्वच्छता केली जाईल. रुग्ण व नातेवाइकांची गैरसोय दूर करण्यात येईल.

**- डॉ. राजेंद्र वाबळे,** अधिष्ठाता, वायसीएम रुग्णालय.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 4 Jun 08, 2023
Powered by: erelego.com

दिनांक ०८ जून २०२३

यशवंतराव चव्हाण रुग्णालय पिंपरी या रुग्णालयातील दुरावस्थेबाबत प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांची प्रतिक्रिया












## दिनांक ११ जून २०२३
## गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा

रोजी पिंपरी चिंचवड एज्युकेशन सोसायटी यांच्या वतीने पिंपरी चिंचवड महानरपालिकेच्या उर्दू मध्यामिक शाळांमधून उत्कृष्ठ कामगिरी केलेले दहावीचे विद्यार्थी आणि शहरातील इतर शाळांमधून ९०% पेक्षा जास्त मार्क्स घेतलेल्या दहावी आणि बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आणि करिअर मार्गदर्शनाचा कार्यक्रम ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक सभागृह पिंपरी येथे आयोजित करण्यात आला होता.

यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन केले व गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित केले.





## दिनांक ११ जून २०२३
## दहा हजारांची शैक्षणिक_मदत

अतिश सतीश कांबळे ( दुर्गेवाडी,यवत,ता.दौंड जिल्हा पुणे. ८०१०९४३४९४ ) या विद्यार्थ्याला BCA या अभ्यासक्रमाकरिता मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स डेक्कन जिमखाना पुणे या महाविद्यालयात ऍडमिशन घ्यायचे होते. ३६५४० रुपये फीस होती.आई वडील मजुरी काम करतात घरची परिस्थिती हालाखीची असल्याने त्याला १० हजार कमी पडत होते संस्थेच्या माध्यमातून १० हजार रुपये  व शैक्षणिक साहित्याची मदत करण्यात आली.

# पालिका शाळेतील विद्यार्थ्यांची बससेवा पूर्ववत सुरू करा

पिंपरी, दि. २ (प्रतिनिधी) - महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना महापालिकेच्या वतीने मोफत बससेवा उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यामुळे दूरवरच्या अंतरावरील शाळेतही विद्यार्थी प्रवास करून जायचे; मात्र ही बस सेवा कोरोना काळात बंद करण्यात आली. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे मागील शैक्षणिक वर्ष वाया गेले आहे. ही बाब लक्षात घेऊन, यंदाच्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांसाठी मोफत बससेवा पूर्ववत सुरू करण्याची मागणी रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने करण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड शहर हे कामगार व उद्योगनगरी म्हणून ओळखले जाते. राज्यभरातील विविध कानाकोपऱ्यातून मजूर कामगार कामासाठी पिंपरी चिंचवड शहरात येतात. या शहरातील विविध भागातील बांधकाम,मजूर यांच्या शाळाबाह्य विद्यार्थ्यांना अडीच ते ३ किलोमीटर अंतरावर महापालिकेच्या शाळेत जावे लागते. मात्र महापालिकेकडून दिली जाणारी बससेवा बंद असल्याने पालक आपल्या मुलांना पायी शाळेत पाठवण्यासाठी तयार होणार नाहीत. तसेच लहान मुलांना केवळ होण्याच्या भितीने पालक एकट्या विद्यार्थ्यांना दूर अंतरावरील शाळेत पाठवत नाहीत. यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू शकतात. त्यामुळे ही बस सेवा परत सुरू झाल्यास ही मुले पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात येऊ शकतील.

## महापालिका शाळेतील मुलांसाठी बस सेवा पूर्ववत



पिंपरी, दि. १४ (प्रतिनिधी) - पिंपरी-चिंचवड महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी उपलब्ध करून आलेली बस सेवा कोरोनामध्ये बंद झाली. त्यानंतर ती सुरूच करण्यात आली नव्हती. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून मात्र, ही बससेवा पूर्ववत सुरू करण्यात आल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी दिली आहे.

रावेत, पुनावळे, किवळे, मोशी-चिखली या भागातील बांधकाम कामगार आणि मजुरांच्या मुलांना घरापासून अडीच ते तीन किलोमीटर दूर असलेल्या शाळांमध्ये जावे लागते. यासाठी महापालिकेने मोफत बससेवा सुरू केली होती. शहरातील विविध भागातील बांधकाम कामगार, मजूर यांच्या शाळाबाह्य विद्यार्थ्यांना अडीच ते तीन किलोमीटर अंतरावर महापालिकेच्या शाळेत जावे लागते. विद्यार्थ्यांची पायपीट लक्षात घेता महापालिकेने विद्यार्थ्यांसाठी मोफत बससेवा सुरू केली. ही बससेवा करोना काळात बंद झाली. स्थिती पूर्ववत झाल्यानंतरही बंद पडलेली बससेवा अद्याप सुरू केली नव्हती. गतवर्षी बससेवा सुरू न झाल्याने अनेक विद्यार्थी शाळेत जाऊ शकले नाहीत. अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले.

यंदा शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वीच शिक्षण विभागाने बस सेवा सुरू करण्याची मागणी केली होती. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त जगताप यांनी पीएमपी प्रशासनाला पत्रव्यवहार करून बस उपलब्ध करून देण्याची सुचना केली आहे. त्यामुळे आज(गुरुवार) पासून शैक्षणिक वर्षाला सुरुवात होत असून विद्यार्थ्यांना बससेवा उपलब्ध होणार आहे.

## रयत विद्यार्थी विचार मंच च्या मागणीला यश

*पिंपरी चिंचवड शहरातील विविध भागातील बांधकाम,मजूर यांच्या शाळाबाह्य विद्यार्थ्यांना अडीच ते ३ किलोमीटर अंतरावर महापालिकेच्या शाळेत जावे लागते. विद्यार्थ्यांची पायपीट लक्षात घेता पिंपरी चिंचवड महापालिकेने विद्यार्थ्यांसाठी मोफत बस सेवा सुरु केली होती परंतु हि बस सेवा कोरोना काळात बंद करण्यात आली. कोरोनाकाळात बस सेवा बंद झाली असल्याने ही पुन्हा सुरु करावी याची मागणी निवेदनाद्वारे अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे करण्यात आली होती.*

**धन्यवाद पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

दिनांक १५ जून २०२३





## दिनांक १६ जून २०२३

## गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त राबवण्यात आलेल्या एक वही एक पेनया अभियान अंतर्गत जमा झालेल्या शैक्षणिक साहित्यातून  गरिब गरजू विद्यार्थ्यांना वह्या,पेन शैक्षणिक साहित्याचे मोफत मदत

दिनांक : १५/०६/२०२३

प्रति,
मा.शिक्षणाधिकारी साहेब,
माध्यमिक विभाग, जिल्हा परिषद,
पुणे.

विषय : २६ जानेवारी २०२३ रोजी प्रजासत्ताक दिनी मोबाईल जवळ ठेवल्याने शाळेतुन बडतर्फ व इयत्ता १० वी मधुन शिक्षणापासुन वंचित ठेवले बाबत...

मा.महोदय,

मी अदिती स्वाती बनसोडे, रा. केशवनगर, मुंढवा, पुणे. इयत्ता १ ली पासुन इयत्ता ९ वी पर्यंत पुढील जय जवान शिक्षण संस्थेच्या मदर टेरेसा शाळा (इंग्रजी माध्यम) येथे शिकत असुन माझ्या सोबत घडलेला प्रसंग मी पुढील प्रमाणे आपणास लेखी स्वरूपात मांडत आहे. कृपया मला आपले वतीने न्याय मिळावा ही विनंती.

दि. २६ जानेवारी २०२३ शाळेत प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. त्या कार्यक्रमामध्ये मला प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्याची जबाबदारी देण्यात आली होती. व लेखी स्वरूपात काही मजकुर पाठांतर करण्यासाठी देखील शाळेच्यावतीने मला देण्यात आला होता.

शाळा सुटल्यानंतर माझे मामा मला घेण्यासाठी येणार असल्याने माझी आई स्वाती बनसोडे जी सिंगल मदर आहे तिने संपर्क साधण्यासाठी माझ्याकडे मोबाईल दिला होता, मी शाळेत गेल्यानंतर लागलीच याची कल्पना माझ्या शिक्षकांना दिली, आणि त्यांच्याच परवानगीने मोबाईल माझ्या जवळ ठेवला व कार्यक्रमाच्या तयारीला लागणारा मजकुर कागदावर अतरवुन घेतला.

आवक लिपीक
12 JUN 2023
शिक्षण माध्यमिक विभाग
पुणे जिल्हा परिषद,पुणे

मजकुर उतरवुन घेत असतांना प्रमुख पाहुण्यांचे आगमन झाल्याने घाई–गडबडीत माझ्या वतीने मोबाईल शाळेत जमा करण्याचे राहुन गेले तरी मी शिक्षकांना हे सांगीतल्यानंतर मोबाईल तुझ्याकडे राहुदे, असे सिनलकर सरांनी मला सांगीतले. शाळेचा कार्यक्रम उरकल्यानंतर मी घरी जाण्यासाठी गेट मधुन बाहेर पडले असता, मला प्रिंसिपल जाधव मॅडमने बोलावले आहे असे सांगण्यात आले. मी मॅडमच्या केबीनमध्ये जाताच माझा मोबाईल हिसकावुन घेण्यात आला, मी विनंती करून सुध्दा मोबाईल परत दिला नाही. व पालकांना घेवुन आल्याशिवाय तुला मोबाईल मिळणार नाही असे सांगण्यात आले. माझ्या आईला कामावर मोबाईल गरजेचा असल्याने मी वारंवार विनंती करूनही मोबाईल परत दिला नाही. मी घरी घडलेला सर्व प्रकार सांगीतल्यानंतर दुस–या दिवशी दि.२७.०१.२०२३ रोजी मी, माझी आई व मामा आम्ही मॅडमला भेटायला गेलो व त्यांना पुन्हा माफी मागीतली. माझ्या पालकांनी देखील माफी मागीतली, तरी त्यांनी ऐकले नाही. नंतर मी त्यांचे पाय पकडुन विनंती करू लागले, प्रिन्सिपल यांना माझे मामा यांनी 'आमची मुलगी तुमचे पाय पकडते तरी तुम्हाला कळवळा येत नाही शिक्षक नावाला कलंक असणारी तुमची मानसिकता आहे'. असे बोलल्यानंतर, मॅडमने त्यांच्या जवळील मोबाईल काढुन दिला व त्याच दिवशी मला पुढील १५ दिवसांकरीता शाळेत येण्यासाठी बडतर्फ करीत प्रतीबंध कारण्यात आला व पुढील शैक्षणिक वर्षामध्ये बसु न देण्याचे पत्र देण्यात आले. जे मी या पत्रासोबत जोडत आहे.

तसेच १५ दिवसांनी मी शाळेत गेल्यावर सर्व विद्यार्थ्यांसमोर मी शाळेची आदर्श विद्यार्थिनी असलेला बॅच अपमानीत करून काढण्यात आला. तिथपासुन पुढे मला शाळेच्या कोणत्याही इतर अॅक्टीव्हिटी मध्ये सहभाग घेवु दिला नाही. ईतर विद्यार्थ्यांना माझ्याशी बोलण्यावर प्रतिबंध घालणे व वारंवार मला अपमानीत करणे अशी वागणुक देण्यात आली. १ जुन २०२३ रोजी इयत्ता १० वी चे शैक्षणिक वर्ष चालु झाल्यानंरत मी शाळेत गेल्यावर मला वर्गात बसु दिले नाही, मी विनंती केली तरी मला शाळेत बसु देणार नाही अशी भुमीका प्रिन्सीपल मॅडम यांनी घेतली. तेंव्हा पासुन मी शिक्षणापासुन वंचित असुन कृपया माला न्याय द्यावा व माझे होणारे शैक्षणिक नुकसान थांबवावे व अशा सुचना आपले वतीने शाळेस द्याव्यात ही विनंती.

कळावे...

आपली अज्ञाधारक
Aditi
अदिती बनसोडे

प्रतिलीपी आपल्या माहितीस्तव सादर

१. मा.धम्मराज साळवे, संस्थापक अध्यक्ष, रयत विद्यार्थी विचार मंच, महाराष्ट्र राज्य.
२. मा.गौरव जाधव, प्रवक्ते– पुणे शहर, वंचित बहुजन आघाडी.

| | | |
|---|---|---|
| | जिल्हा परिषद, पुणे<br>**माध्यमिक शिक्षण विभाग**<br>२ रा मजला, यशवंतराव चव्हाण भवन, (जुनी इमारत) सोमवार पेठ, पुणे-११ | फोन - ०२०-२६०६१७३३<br>इमेल - rmsapunezp@gmail.com |

जा.क्र. शिक्षण/का-१२, कावि/५१८०/२०२३ पुणे. दिनांक :- १९/०६/२०२३.

प्रति,

मुख्याध्यापक,
मदर तेरेसा स्कूल व ज्यु. कॉलेज, पुणे - १४

**विषय:- मुलांना शाळा बाळय करुन शाळा सोडल्याचा दाखला पाठविलेबाबत.**

**संदर्भ :- १. कु. आदिती बनसोडे यांचे कडील तक्रारी अर्ज दि. १३/०६/२०२३**

उपरोक्त संदर्भिद विषयान्वये कळविण्यात येते की, संदर्भ क्रं. १ अन्वये कु. आदिती बनसोडे ही विद्यार्थीनी आपल्या प्रशालेत शिक्षण घेत आहे. सदर विद्यार्थीस आपण काही कारणास्तव बडतर्फ केले आहे सदर विद्यार्थीनी ही इ. ९ वी पास असून इ. १० वी चे शिक्षणास पात्र असताना सदर विद्यार्थीनीला इ. १० वी च्या वर्गात न बसवता दाखला टपालाने पाठवून दिलेबाबत तक्रार अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

तरी कु. आदिती बनसोडे तक्रारी अर्जानूसार पुर्नप्रवेशाबातची कार्यवाही शासन नियमानूसार करुन आपल्या स्तरावरुन परस्पर संधित पालकांना कळवावे व तसा अहवाल या कार्यालयात सादर करावा अहवाला सोबत आपल्या शाळेकडील सर्व शासन मान्यता प्रत सादर करावे त्याच प्रमाणे सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नूकसान होणार नाही याची दखल घ्यावी.

सोबत :- संदर्भिय पत्र.

(सुनंदा वाखारे)
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
**पुणे जिल्हा परिषद,पुणे**

प्रत :- १. कु. आदिती बनसोडे

पुणे जिल्हा परिषद, पुणे

## दिनांक २० जून २०२३
## लढा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक न्याय हक्कासाठी
## लढा खाजगी शाळेच्या गैरकारभाराविरुद्ध

२६ जानेवारी २०२३ रोजी प्रजासत्ताक दिनी आदिती बनसोडे या विद्यार्थिनीने शिक्षकांच्या परवानगीने मोबाईल स्वतःजवळ ठेवला होता.तरी देखील जय जवान संस्थेच्या संत मदर टेरेसा(वडगावशेरी पुणे ) या शाळेने आदितीला १५ दिवस शाळेतून बडतर्फ करण्यात आले.व विद्यार्थिनीच्या घरी पोस्टाने दाखला पाठवून दिला.आदिती बनसोडे या विद्यार्थिनीने या संदर्भात रयत विद्यार्थी विचार मंच या आमच्या संस्थेकडे व वंचित बहुजन आघाडीचे आमचे मित्र पुणे शहर प्रवक्ते गौरव जाधव यांच्याकडे लेखी तक्रार केली. विद्यार्थिनीच्या तक्रार अर्जाची दखल घेत पुणे जिल्हा परिषद येथे जाऊन मधामिक विभागाच्या शिक्षण अधिकारी यांची भेट घेऊन त्यांना या मुजोर शाळेच्या विरोधात नोटीस काढायला लावली व विद्यार्थिनीला तात्काळ दहावी मध्ये बसवण्यात यावे यासंदर्भात शाळेला लेखी आदेश देण्यात आले.





दिनांक २० जून २०२३

पिंपरी चिंचवड शहरातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत


पिं.चिं.मनपा माध्यमिक विद्यालय खराळवाडी पिंपरी
राजर्षी छत्रपती


राजर्षी छत्रपती
शाहू महाराज


राजर्षी छत्रपती
शाहू महाराज


राजर्षी छत्रपती
शाहू महाराज


राजर्षी छत्रपती





## दिनांक २६ जून २०२३

## शैक्षणिक उपक्रमाच्या माध्यमातून छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी

## गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी खराळवाडी येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालय येथे रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिम्मित शैक्षणिक उपक्रम राबवण्यात आला यावेळी इयत्ता आठवीच्या ४० विद्यार्थ्यांना इयत्ता नववीच्या ६५ विद्यार्थ्यांना व इयत्ता दहावी च्या ३१ विद्यार्थ्यांना विज्ञान प्रयोग वही,पेन्सिल,पट्टी,खोडरबर,शॉपनर या शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने भोये.एन के सर,जाधवर मॅडम,कातखडे मॅडम,आठवले मॅडम,शिंदे सर,लता साळवे शाल व तुळशीचे रोप देऊन यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी केले कार्यक्रमाची प्रस्तावना राज्य समनव्यक श्वेता ओव्हाळ व कार्यक्रमाचे आभार प्रगती कोपरे यांनी केले यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे नीरज भालेराव,रोहित कांबळे, स्वराज कांबळे,सचिन सूर्यवंशी,शमशुद्दिन गाझी,अतुल वाघमारे,विक्रांत शेळके,भाग्यश्री आखाडे,उपस्थित होते.....

शोषित, पिडीत, वंचित घटकांच्या न्याय हक्कासाठी सदैव तत्पर असणारं आपल हक्काच

रिपब्लिकन आवाज न्युज

बातम्या ! विश्लेषण ! बरच काही

संपादक :- अमोल एल. डंबाळे

web : www.republicanaawajnews.com Email : republicanaavaj@gmail.com 9028 633 644 Digital

# रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने १३६ विद्यार्थ्यांना विज्ञान प्रयोग वही व शैक्षणिक साहित्याचे केले वाटप

पुणे

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी खराळवाडी येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालय येथे रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला शाळेचे मुख्याध्यापक एन.के.भोये सर व रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या माध्यमातून छत्रपती शाहू महाराज यांची जयंती शैक्षणिक उपक्रमातून साजरी करण्यात आली यावेळी इयत्ता आठवीच्या ४० विद्यार्थ्यांना इयत्ता नववीच्या ६५ विद्यार्थ्यांना व इयत्ता दहावी च्या ३१ विद्यार्थ्यांना विज्ञान प्रयोग वही,पेन्सिल,पट्टी,खोडरबर,शॉपनर या शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे मावळ तालुका महासचिव विक्रांत शेळके यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्याचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी असे मत व्यक्त केले की छत्रपती शाहू महाराज यांनी त्यांच्या राज्यात आपल्या पाल्यांना शाळेत पाठवा अन्यथा १ रुपये दंड भरा असा नियम केला होता.त्यांच्या या आदेशावरून महाराजांना शिक्षणाविषयी अत्यंत आवड होती हे दिसून येते आणि यामुळेच रयत संस्थेच्या वतीने आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या खराळवाडी माध्यमिक विद्यालय येथे महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून शैक्षणिक उपक्रमाच्या माध्यमातून इयत्ता ८ वी ते १० वी च्या १३६ गरीब गरजू विद्यार्थ्यांना विज्ञान प्रयोग वह्या व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले आहे..



तसेच शाळेचे मुख्याध्यापक एन.के.भोये सर यांनी यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या कार्याचे कौतुक केले.व रयत विद्यार्थी विचार संस्थेने अश्याच पद्धतीने गरीब गरजू विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना शैक्षणिक मदत करावी असे मत व्यक्त केले.

यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने भोये.एन के सर,जाधवर मॅडम,कातखडे मॅडम,आठवले मॅडम,शिंदे सर,लता साळवे शाल व तुळशीचे रोप देऊन यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी केले कार्यक्रमाची प्रस्तावना राज्य समन्वयक श्वेता ओव्हाळ व कार्यक्रमाचे आभार प्रगती कोपरे यांनी केले. यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे नीरज भालेराव,रोहित कांबळे, स्वराज कांबळे,सचिन सूर्यवंशी,शमशुद्दिन गाडी,अतुल वाघमारे, विक्रांत शेळके, भाग्यश्री आखाडे उपस्थित होते.

# शाहू महाराज जयंतीनिमित्त गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**खराळवाडी, दि. २७ (वार्ताहर)** - रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी खराळवाडी येथील महापालिकेच्या माध्यमिक विद्यालयात छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला शाळेचे मुख्याध्यापक एन. के. भोये व रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी इयत्ता आठवीच्या ४० विद्यार्थ्यांना इयत्ता नववीच्या ६५ विद्यार्थ्यांना व इयत्ता दहावी च्या ३१ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या वेळी धम्मराज साळवे म्हणाले, छत्रपती शाहू महाराज यांनी त्यांच्या राज्यात आपल्या पाल्यांना शाळेत पाठवा अन्यथा १ रुपये दंड भरा, असा नियम केला होता. त्यांच्या या आदेशावरून महाराजांना शिक्षणाविषयी अत्यंत आवड होती हे दिसून येते. त्यामुळेच महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून शैक्षणिक उपक्रमाच्या माध्यमातून इयत्ता ८ वी ते १० वी च्या १३६ गरीब गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. या वेळी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे नीरज भालेराव, रोहित कांबळे, स्वराज कांबळे उपस्थित होते.



## दिनांक ०२ जुलै २०२३

### अनफिट असणाऱ्या ८०३ स्कुल बसेस वर तात्काळ कारवाई करण्याची मागणी

विद्यार्थ्यांच्या जीविताशी खेळणाऱ्या शहरातील अनफिट असणाऱ्या ८०३ स्कुल बसेस वर तात्काळ कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे वरीष्ठ पोलीस निरीक्षक वाहतुक प्रशासन नंदकुमार यांच्याकडे करण्यात आली रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे





## दिनांक ०४ जुलै २०२३

## मजुरांच्या मुलांच्या शिक्षणासाठी पुन्हा बससेवा सुरू

पिंपरी चिंचवड शहरातील बांधकाम मजुरांच्या विद्यार्थ्यांची पायपीट लक्षात घेता पिंपरी चिंचवड महापालिकेने विद्यार्थ्यांसाठी मोफत बस सेवा पुन्हा सुरू केली त्याबद्दल महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त ३ उल्हास जगताप साहेब व शिक्षण अधिकारी संजय नाईकडे साहेब यांनी तात्काळ दखल घेत मजूर कामगारांच्या मुलांसाठी ही बससेवा पुन्हा चालू केली याबद्दल रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने त्यांना पुष्पगुच्छ देऊन आभार व्यक्त केले..










## दिनांक ०८ जुलै २०२३

## प्रज्ञा प्रसारक मंडळाच्या शाळेला सदिच्छा भेट

प्रज्ञा प्रसारक मंडळाच्या शाळेला आज रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी सदिच्छा भेट दिली यावेळी संचालक गोरख गवळी सर यांनी सन्मान करत शाळा कामकाज विद्यार्थी कलागुण यांची माहिती दिली




दिनांक ०९ जुलै २०२३

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने
गरजू विद्यार्थ्यांला शैक्षणिक साहित्याची मदत


शिक्षण | रोजगार | आरोग्य | कला | क्रीडा | महिला सक्षमीकरण
रयत विद्यार्थी विचार मंच (महाराष्ट्र राज्य)
संस्थापक/अध्यक्ष : धम्मराज साळवे
गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ






शिक्षण | रोजगार | आरोग्य | कला | क्रीडा | महिला सक्षमीकरण


शिक्षण | रोजगार | आरोग्य | कला | क्रीडा | महिला सक्षमीकरण










शिक्षण | रोजगार | आरोग्य | कला | क्रीडा
(महाराष्ट्र राज्य)


(महाराष्ट्र राज्य)
सत्कार समारंभ


शिक्षण | रोजगार | आरोग्य | कला | क्रीडा
विचार मंच
धम्मराज साळवे


क्रीडा | महिला सक्षमीकरण

शिक्षण | रोजगार | आरोग्य | कला | क्रीडा | महिला सक्षमीकरण
रयत
संस्थापक

शिक्षण | रोजगार
रयत
संस्थापक

शिक्षण | रोजगार | आरोग्य | कला | क्रीडा
रयत
(महाराष्ट्र राज्य)





## दिनांक १६ जुलै २०२३
## गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा करिअर मार्गदर्शन..

रयत विद्यार्थी विचार मंच संस्था व जेट इंडिया अव्हिएशन व हॉस्पिटीलीटी मॅनेजमेंट यांच्या विशेष सहकार्याने दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व करिअर मार्गदर्शन कार्यक्रम चिंचवड जेट इंडिया महाविद्यालयाच्या कॅम्पस हॉल मध्ये आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त ३ मा.उल्हास जगताप साहेब,शिक्षण अधिकारी मा.संजय नाईकडे साहेब होते.तसेच यावेळी प्रमुख उपस्थितीत जेट इंडिया च्या CEO मा.शिरीन वस्तानी,API मा.गुलाम शेख उपस्थित होते...कार्यक्रमाचे अध्यक्ष रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर होते..

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन केले..तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह,प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले...

शोषित, पिडीत, वंचित घटकांच्या न्याय हक्कासाठी सदैव तत्पर असणारं आपलं हक्काच

रिपब्लिकन आवाज न्युज

बातम्या ! विश्लेषण ! बरच काही

संपादक :- अमोल एल. डंबाळे

web : www.republicanaawajnews.com Email : republicanaavaj@gmail.com 9028 633 644 Digital

# रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व करिअर मार्गदर्शन सोहळा संपन्न

अभिषेक शेंडगे

चिंचवड : रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व करिअर मार्गदर्शन कार्यक्रम चिंचवड काळभोरनगर येथील जेट इंडिया महाविद्यालयाच्या कॅम्पस हॉल मध्ये आयोजित करण्यात आला होता....

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त ३ मा.उल्हास जगताप साहेब,शिक्षण अधिकारी मा.संजय नाईकडे साहेब होते.प्रमुख उपस्थिती जेट इंडिया च्या ग्रुप मा.शिरीष वालानी तसेच माजी -प्रमुख मा.गुलाम शेख उपस्थित होते...कार्यक्रमाचे अध्यक्ष रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे होते...

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक अतिरिक्त आयुक्त ३ मा.उल्हास जगताप साहेब यांनी विद्यार्थ्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने देण्यात येणाऱ्या शैक्षणिक योजनांची माहिती देऊन त्या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन केले. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे शिक्षण अधिकारी संजय नाईकडे साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना असे मत व्यक्त केले कि शिक्षण घेऊन मोठ्या मोठ्या पदावर गेलेच पाहिजे, पैसे कमावले पाहिजे पण त्याचबरोबर आपण एक चांगला माणूस देखील बनले पाहिजे. पद प्रतिष्ठा यासोबत माणुसकीचा देखील आदर्श गुण आपण आपल्यामध्ये जोपासला पाहिजे.तसेच अध्यक्षीय भाषणात धम्मराज साळवे सर यांनी असे मत व्यक्त केले कि विद्यार्थ्यांना वेळोवेळी कौतुकाची थाप दिली पाहिजे त्यांच्यातील कलागुणांना वाव दिला पाहिजे. यासाठीच रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या माध्यमातून वेळोवेळी शैक्षणिक उपक्रम राबवले जातात..

यावेळी सर्व मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह,प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रणाली कापसे ,संविधान प्रास्ताविकेचे वाचन सोमनाथ पाटील,कवितेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे काम विक्रांत शेळके व आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव अमर पुनेकर यांनी केले.या कार्यक्रमासाठी जेट इंडिया अविएशन व हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट या संस्थेने विशेष सहकार्य केले.




यावेळी रयत विद्यार्थी विचार मंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे ,प्रदेश महासचिव संतोष शिंदे,सचिव नीरज भालेराव, सचिव अमर पुनेकर संघटक रोहित कांबळे,महासचिव प्रणाली कोपरे,समन्वयक ध्रुवा ओव्हाळ,भाग्यश्री आखाडे , तेजस्विनी वाघमारे,प्रणाली कायंदे,सोनल म्हस्कर,सोमनाथ पाटील, अतुल वाघमारे,विक्रांत शेळके,सागर गायकवाड,अजय चक्रनारायण, अभिषेक चक्रनारायण, मयूर जगताप,साक्षी शेख,काजल कांबळे,समाधान गायकवाड, महेश गायकवाड,संकेत पडळकर,अभिजीत लगाडे,प्रीतम वाघमारे,निखिल उबाळे,जयेश जाधव,वैभव पाटील,किशोर शेळके ,अक्षय गायकवाड ,स्वराज कांबळे ,जीवन साळवे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.



MPC NEWS

Home > ठळक बातम्या > PMAY : आवास योजनेत अर्ज करण्यास मुदतवाढ द्या, 'रयत'ची मागणी

ठळक बातम्या, पिंपरी चिंचवड · 1 MINUTE READ

# PMAY : आवास योजनेत अर्ज करण्यास मुदतवाढ द्या, 'रयत'ची मागणी

NEHA
जुलै 18, 2023




**एमपीसी न्यूज : – प्रधानमंत्री आवास योजनेची मुदत एक महिना (PMAY) वाढविण्याची मागणी रयत विद्यार्थी विचार मंचाने महापालिकेकडे केली आहे.**

याबाबत आयुक्त शेखर सिंह यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केंद्र शासनच्या प्रधानमंत्री योजने अंतर्गत महापालिकेमार्फत आकुर्डी व पिंपरी येथे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे बांधणे प्रकल्प राबविण्यात आला आहे.

या प्रकल्पातील घरांकरिता महापालिका हद्दीतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गात येणार्या नागरिकांकडून ऑनलाईन अर्ज मागवले आहेत. याकरिता 28 जुलै शेवटची अंतिम तारीख दिली आहे.

938 घरांसाठी राबवण्यात आलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेला (PMAY) मोठ्या प्रमाणात नागरिकांचा प्रतिसाद आहे. याकरिता नागरिकांनी मोठ्या प्रमाणात तहसील कार्यालयामध्ये उत्पन्न दाखला व डोमेसाइल दाखला, जातीचा दाखला इत्यादी योजनेसाठी लागणाऱ्या कागदपत्रे काढण्यासाठी अर्ज केले आहेत.

यामुळे तहसील कार्यलय कामकाजावर मोठ्या प्रमाणात भार आला असून नियमित वेळेपेक्षा नागरिकांना दाखले मिळण्यासाठी अधिकचा वेळ लागत आहे. यामुळे अनेक गरजू नागरिक आपल्याला वेळेवर आपले दाखले मिळतील कि नाही या चिंतेत आहेत.

**Kirit Somaiya : काँग्रेस पक्षाच्या महिलांनी पुणे महापालिकेतील गंगाजल शिंपडून 'ती' जागा केली शुद्ध**

या तांत्रिक गोष्टींचा विचार करता कोणीही गरजू नागरिक या योजनेपासून वंचित राहू नये याकरिता योजनेस एक महिना मुदत वाढवण्याची मागणी केली.

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेचे संस्थापक धम्मराज साळवे, प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी निवेदन दिले आहे.

दिनांक १८ जुलै २०२३

प्रधानमंत्री आवास योजनेची मुदत १ महिना वाढणेबाबत रयत विद्यार्थी विचार मंच च्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्तांना निवेदन








## दिनांक १८ जुलै २०२३
## विद्यार्थ्यांपर्यंत साहित्य पोहचले

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उपक्रमाच्या माध्यमातू उस्मानाबाद जिल्ह्यातील कसबे तडवळे या गावी मातृभूमी विद्यानिकेतन या आश्रम शाळेतील १०० विद्यार्थ्यांना वह्या पेन हे साहित्य पार्सल च्या माध्यमातून पाठवले होते ते साहित्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहच होऊन त्याचे वाटप झाले.शाळेच्या संस्थाचालकांनी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या सर्व टीम चे आभार मानून संस्थेच्या कार्यास शुभेच्छा दिल्या.....

नो.क्र. महा.250/1996,एफ-3157

जनकल्याण ग्रामीण विकास मंडळ ,क.तडवळे ता.जि.उ.बाद

मातृभूमी केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक निवासी शाळा,

कसबे तडवळे ता.जि.उस्मानाबाद.

शाळा मान्यता क्र:सीएएस2005/प्र.क्र.-459मावक-4 दि.18/02/2006

शाळा (S.S.C.) बोर्ड क्रमांक - 59.01.083

UDISE NO. :- 27290510406

अध्यक्ष

मुख्याध्यापक

आ.क्र.18/2023

दि. 21/08/2023

प्रति,

१. मा.धम्मराज साळवे
संस्थापक / अध्यक्ष

२. मा. संतोष शिंदे
प्रदेश महासचिव
रयत विद्यार्थी विचार मंच
पिंपरी पुणे ४११०१८

विषय : रयत विदयार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने कसबे तडवळे ( उस्मानाबाद ) येथील मातृभूमी केंदीय प्राथमिक व माध्यमिक निवासी शाळेतील १०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पाठवल्याबद्दल आपले खूप खूप आभार...

महोदय,

मातृभूमी केंदीय प्राथमिक व माध्यमिक निवासी शाळा हि उस्मानाबाद जिल्ह्यातील कसबे तडवळे या गावात चालवली जाते.या शाळेत कष्टकरी ,वंचित व मागासवर्गीय कुटुंबातील मुले शिक्षण घेतात.विद्यार्थ्यांनाकडून कोणतेही शुल्क न घेता मोफत शिक्षण दिले जाते.

मातृभूमी कैंदीय प्राथमिक व माध्यमिक निवासी शाळेतील विद्यार्थी हे अतिशय गरीब कुटुंबातील असून त्यांना शैक्षणिक साहित्य घेणे शक्य होत नाही...सोशल मीडियाच्या माध्यमातून रयत विद्यार्थी विचार मंच हि संस्था भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती शैक्षणिक उपक्रमाच्या माध्यमातुन साजरी करते हे समजले याकरिता संस्थेचे प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांच्याशी संपर्क साधून पत्राद्वारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्याची विनंती केली होती.

कसबे तडवळे हे ऐतिहासिक गाव असून डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने हि पावन झालेली भूमी आहे आणि आपण त्यांच्या जयंती उपक्रमाच्या माध्यमातून आमच्या विनंतीचा विचार करून निवासी शाळेतील १०० विद्यार्थ्यांना वह्या,फुल स्केप वह्या, पेन इत्यादी शैक्षणिक साहित्याची मदत पाठवली याबाबद्दल आम्ही आपले खूप खूप आभारी आहोत.

आपल्या संस्थेचे शैक्षणिक कार्य हे अतिशय कौतुकास्पद आहे. आपल्या या शैक्षणिक कार्यास आमच्या खूप खूप शुभेच्छा...

21.08.2023

मुख्याध्यापक

मातृभूमी केंद्रीय प्राथमिक व माध्य. निवासी शाळा,तडवळे (क.)ता.जि.उस्मानाबाद

## दिनांक २१ जुलै २०२३

कसबे तडवळे या गावी मातृभूमी विद्यानिकेतन या आश्रम शाळेतील १०० विद्यार्थ्यांना वह्या पेन हे साहित्य पार्सल च्या माध्यमातून पाठवले होते.शाळेच्या संस्थाचालकांनी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या सर्व टीम चे आभार मानून संस्थेच्या कार्यास शुभेच्छा दिल्या.....

Ref. No.:M3303/2023
दिनांक : 20-07-2023

masoom
LIGHTING UP NIGHT SCHOOLS

प्रति,
१) मा. धम्मराज साळवे
संस्थापक/अध्यक्ष
२) मा.संतोष शिंदे
प्रदेश महासचिव
रयत विद्यार्थी विचार मंच
पिंपरी पुणे ४११०१८

विषय : रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या माध्यमातून मासूम संस्था सलग्न रात्रशाळेतील ५० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत पाठवल्याबद्दल आपले खूप खूप आभार

महोदय,

'मासूम' ही स्वयंसेवी सामाजिक संस्था मुंबई व मुंबई उपनगर, पुणे मालेगाव, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, नागपूर, सांगली, उस्मानाबाद आणि अहमदनगर यासारख्या विविध माध्यमाच्या ९८ रात्रशाळांचा गुणात्मक विकास करण्यासाठी कार्य करणारी एकमेव सामाजिक संस्था आहे.

आपली **रयत विद्यार्थी विचार मंच संस्था** महाराष्ट्रातील गरीब गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मोफत देते. याकरिता संस्थेचे **प्रदेश महासचिव संतोष शिंदे** यांच्याशी संपर्क साधून व विनंती अर्ज करून आमच्या रात्रशाळेतील विद्यार्थ्यांना साहित्य मिळावे अशी विनंती करण्यात आली.

आपण आमच्या विनंतीचा विचार करून आमच्या रात्रशाळेतील ५० विद्यार्थ्यांसाठी वह्या, पेन, पेन्सिल, पट्टी, खोडरबर, शॉपनर इत्यादी शैक्षणिक साहित्याची मदत पाठवली याबद्दल आम्ही आपले खूप खूप आभारी आहोत.

आपल्या संस्थेचे कार्य हे अतिशय प्रेरणादायी असून आपल्या माध्यमातून गरीब गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी असेच कार्य घडावे.

आपल्या संस्थेच्या पुढील कार्यास खूप खूप शुभेच्छा.....

आपली नम्र,

MASOOM MUMBAI

निकिता केतकर
संचालिका - मासूम

Masoom Office Address : Plot No. 788, Jame Jamshed Road, Parsi Colony, Dadar T.T., Mumbai - 400014.
www.masoomeducation.org * Contact No.: 02224132202 / +91 9167577131

दिनांक २२ जुलै २०२३

मासूम संस्थेच्या वतीने चालवल्या जाणाऱ्या रात्रशाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पाठवल्याबद्दल मासूम संस्थेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

# जाहिर प्रकटन

केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आकुर्डी व पिंपरी येथे योजना राबविण्यात येत असुन सदर प्रकल्पाकरिता अर्ज ऑनलाईन भरुन घेण्यासाठी दि.२८/०७/२०२३ रोजीपर्यंत जाहीर प्रकटनाद्वारे मुदत देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने सदर योजनेसाठी आवश्यक कागदपत्रांपैकी अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, जातीचा दाखला इ. कागदपत्रे मिळणेकामी नागरीकांना लागणारा विलंब लक्षात घेता.

सदर प्रकल्पांतर्गत नागरिकांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यासाठी दि.१२/०८/२०२३ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

दिनांक २७ जुलै २०२३

रयत विद्यार्थी विचार मंचच्या मागणीला यश

पंतप्रधान आवास योजनेला १२ ऑगस्टपर्यंत_मुदतवाढ












दिनांक ११ जून २०२३

कला शिक्षक अस्मिता गुरव यांनी प्रा.मोरे प्रेक्षागृहात महापालिकेच्या के.मा.वि.विद्यालयातील उमलता/उगवता चित्रकार साहील याने साकारलेल्या सुंदर चित्रांच्या प्रदर्शनास भेट दिली...अतिशय सुंदर, प्रशंसनात्मक सुंदर चित्रांचे कौतुक करून प्रोत्साहनात्मक कौतुकाची पाठीवर थाप देवुन त्याच्या कलागुणांची प्रशंसा केली.



## दिनांक ३० जुलै २०२३
## चार वर्षांने तो पुन्हा शाळेत जाऊ लागला..
## पालकांनी मानले रयत विद्यार्थी विचार मंचचे आभार

पिंपरी चिंचवड शहरातील एका खाजगी शाळेने ७२ हजार रुपये फीस अभावी धीरज कांबळे या विद्यार्थ्याला इयत्ता ६ वी पासून ते इयत्ता १० वी पर्यंत शिक्षणापासून वंचित ठेवले.पालकांनी अनेक वेळा शाळेच्या मुख्याध्यापकांना विनंती केली की किमान आम्हाला शाळा सोडल्याचा दाखला द्या.तसेच पालकांनी अनेकांकडे तक्रार केली परंतु त्यांना न्याय मिळाला नाही....

पालकांना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेबद्दल माहीत झाल्यावर त्यांनी आमच्याकडे तक्रार केली व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर व प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी पिंपरी चिंचवड महानगपालिकेचे शिक्षण अधिकारी संजय नाईकडे यांच्याकडे पाठपुरावा करत त्या विद्यार्थ्याला न्याय मिळवून दिला संपूर्ण फिस माफ करत विद्यार्थ्याचे झालेले शैक्षणिक नुकसान भरून काढले व धीरज कांबळे या विद्यार्थ्याला थेट इयत्ता ९ वी मध्ये त्याच खाजगी शाळेत प्रवेश मिळवून दिला..यामुळे आज पालकांनी संस्थेच्या कार्यालयाला भेट देत आभारपत्र देत आभार व्यक्त केले.

**प्रति,** **दिनांक: ३०/०७/२०२३**

**मा धम्मराज साळवे सर**

**संस्थापक/अध्यक्ष**

**मा. संतोष शिंदे**

**प्रदेश महासचिव**

**रयत विद्यार्थी विचार मंच**

**पिंपरी पुणे १८**

**विषय : आपल्या सहकार्यामुळे ०४ वर्षानंतर माझ्या मुलाचे शिक्षण पुन्हा सुरु झाल्याने आपले खूप खूप आभार...**

नाव : कविता मार्तंड कांबळे

पत्ता : घरकुल चिखली पिंपरी पुणे..

महोदय,

माझा मुलगा धीरज मार्तंड कांबळे सिद्धिविनायक स्कुल मोरेवस्ती मध इयत्ता ०४ थी पासून शिक्षण घेत होता.परंतु कोरोनामुळे व लॉकडाउन पडल्यामुळे आमची आर्थिक परिस्थिती खराब झाली असल्याने माझ्या मुलाची फीस भरू भरू शकलो नाही त्यामुळे सिद्धिविनायक शाळेने इयत्ता ६ वि पासून सलग पुढे ०४ वर्ष माझ्या मुलाला शिक्षणापासून वंचित ठेवले. महानगरपालिकेच्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी अनेक वेळा सिद्धिविनायक शाळेकडे विनंती केली परंतु ७२ हजार रुपये फीस दिल्याशिवाय शाळेतं बसू देणार नाही व दाखला देखील मिळणार नाही असे सांगण्यात आले.

तसेच अनेक जणांकडे तक्रारी केल्या परंतु आम्हाला न्याय मिळला नाही.रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेबद्दल माहित झाल्यावर आम्ही आमच्या मुलाला न्याय मिळावा त्याचे झालेले शैक्षणिक नुकसान भरून निघावे याकरिता आपल्या संस्थेकडे तक्रारी अर्ज केला व आपण पाठपुरावा करून आमच्या मुलाचे झालेले ०४ वर्षाचे शैक्षणिक नुकसान याची भरपाई करून त्याला सिद्धिविनायक स्कुल मध्ये थेट इयत्ता ०९ वि मध्ये प्रवेश मिळवून दिला व आपल्या सहकार्यामुळे आमची संपूर्ण फीस माफ झाली. याबद्दल आम्ही आपले व आपल्या संस्थेचे खूप खूप आभारी आहोत..,

**आपली विश्वासू**

K.m.kamble.

**कविता मार्तंड कांबळे**

९८५००४६०९५




## दिनांक ३१ जुलै २०२३
## राईट टु एज्युकेशन हा संविधानिक अधिकार...
## पालकांनी मानले रयत विद्यार्थी विचार मंचाचे आभार

स्वरा सिद्धार्थ गायकवाड या विद्यार्थिनीचा पिंपरी चिंचवड शहरातील एका खाजगी इंग्लिश मिडीयम शाळेत इयत्ता पहिली वर्गात RTE अंतर्गत नंबर लागला होता.परंतु नंबर लागून देखील कोरोनाचे कारण सांगून उडवाउडवीची उत्तरे देत स्वरा गायकवाड या विद्यार्थिनीला तब्बल २ वर्ष त्या खाजगी शाळेने शिक्षापासून वंचित ठेवले.स्वराचे पालक यांनी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेकडे त्या शाळेसंदर्भात तक्रार केली होती.

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने प्रशासकीय पत्रव्यवहार करून बालकांचा मोफत व सक्तीच्या शैक्षणिक हक्कानुसार स्वरा गायकवाड ला त्याच खाजगी शाळेत झालेले शैक्षणिक नुकसान भरपाई करून इयत्ता 3 री मध्ये प्रवेश मिळवून दिला.स्वरा आता इयत्ता ४ थी मध्ये शिक्षण घेत आहे..

स्वरा व तिचे पालक सिद्धार्थ गायकवाड यांनी संस्थेच्या कार्यालयाला भेट देत आभारपत्र देऊन आभार व्यक्त केले.










## दिनांक ३१ जुलै २०२३

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती..

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने पिंपरी चिंचवड,पुणे,सोलापूर विभागाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले...

# ‘रयत’तर्फे अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

**पिंपरी, दि. १ (प्रतिनिधी) -** रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त निगडी शक्ती-भक्ती येथील त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

रयत विद्यार्थी विचार मचाचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व पिंपरी-चिंचवड शहर अध्यक्ष अभिषेक चक्रनारायण यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी प्रदेश महासचिव संतोष शिंदे, सचिव अजय चक्रनारायण, समन्वयक प्रतिभा बनसोडे उपस्थित होते.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना तत्कालीन परिस्थितीमुळे शिक्षण घेता आले नाही. परंतु, ते परिस्थितीला शरण न जाता त्यांनी मेहनत घेऊन ते स्वतः साक्षर झाले. त्यांनी जगातील उत्तम अशा साहित्याची निर्मिती केली. जगभर नावलौकिक मिळविला. आजच्या विद्यार्थ्यांनी अण्णा भाऊंच्या जीवनसंघर्षाचा आदर्श घेऊन वाटचाल केली पाहिजे, अशी भावना संस्थेचे पिंपरी-चिंचवडचे अध्यक्ष अभिषेक चक्रनारायण यांनी व्यक्त केले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त रयतच्या वतीने निगडीत पुतळ्याला अभिवादन…!

Posted By: news pcmc on: August 01, 2023
In: ठळक घडामोडी, पिं चिं शहर व उपनगर वार्ता No Comments
Print Email



**न्यूज पीसीएमसी नेटवर्क**

**पिंपरी (दि. ३१ जुलै २०२३) :- रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त निगडी शक्ती भक्ती येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष अभिषेक चक्रनारायण यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.**

यावेळी संस्थेचे पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष अभिषेक चक्रनारायण यांनी जयंतीनिमित्त शुभेच्छा देताना असे मत व्यक्त केले कि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना तत्कालीन परिस्थिती मुळे शिक्षण घेत आले नाही परंतु ते परिस्थितीला शरण न जाता त्यांनी मेहनत घेऊन ते स्वतः साक्षर झाले व त्यांनी जगातील उत्तम अश्या साहित्याची निर्मिती केली. व जगभर नावलौकिक मिळवला आजच्या विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ यांच्या या जीवनसंघर्षाचा आदर्श घेऊन वाटचाल केली पाहिजे.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे प्रदेश महासचिव संतोष शिंदे, पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष अभिषेक चक्रनारायण,सचिव अजय चक्रनारायण, समन्वयक प्रतिभा बनसोडे,समन्वयक माधवी खरात उपस्थित होते.





## दिनांक ०१ ऑगस्ट २०२३
## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिम्मित उल्हासनगर कमला अपार्टमेंट येथील छत्रपती शिवाजी महाराज ,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे , क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे , भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला संस्थेचे उपाध्यक्ष सोमनाथ पाटील , मुख्य सल्लागार अमर शाम शोभा मुनेश्वर , ठाणे जिल्हा अध्यक्ष हर्षल सोनवणे , कल्याण तालुका अध्यक्ष निखिल उबाळे सचिव संकेत यशवंते आणि सदस्य विक्रम पवार, अक्षय वाणी, साहिल माघाडे , तुषार साबळे यांच्या हस्ते पुष्प अर्पण करण्यात आले.




## दिनांक १० ऑगस्ट २०२३

## पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील

कर्मवीर भाऊराव पाटील यांची सप्टेंबर मध्ये १३६ वी जयंती आहे.त्यानिमित्ताने त्यांच्या नावाची भारतरत्न पुरस्कारासाठी शिफारस करून त्यांचे नाव शासकीय महापुरुषाच्या यादीत समाविष्ट करून त्यांची जयंती शासकीय स्तरावर साजरी करण्यात यावी यासंदर्भात रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे साहेब,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार,देवेंद्र फडणवीस व रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.शरद पवार साहेब यांना निवेदन पाठवण्यात आले..


रयत विद्यार्थी विचार मंच
संपर्क कार्यालय

रयत विद्यार्थी विचार मंच
संपर्क कार्यालय







## दिनांक १० ऑगस्ट २०२३
## स्वातंत्र्यदिन साजरा

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने भारताचा ७७ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी पोलीस निरीक्षक मा.रुपाली बोबडे मॅडम तसेच पिंपरी चिंचवड महानगपालिकेचे मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी मा.डॉ.लक्ष्मण गोफने सर सहाय्यक आरोग्य अधिकारी मा. अभयचंद्र दादेराव व संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे सर या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी राष्ट्रगीत व राज्यगीताद्वारे मानवंदना देण्यात आली.



लोकमत

# वायसीएम रुग्णालयात पेशंटवर 'तंत्र-मंत्र'

## अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याचा प्रकार; प्रशासन बघ्याच्या भूमिकेत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहर स्मार्ट सिटी म्हणून ओळखले जात आहे. असे असताना शहरातील महापालिका रुग्णालयामध्ये तंत्र-मंत्राने रुग्णांवर उपचार सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार शुक्रवारी (दि.१८) सकाळी समोर आला आहे. सुरक्षारक्षक, पोलिस, तसेच वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची वर्दळ असतानाही खुलेआम रुग्णालयात जादूटोणा व मंत्रोच्चार करीत एक व्यक्ती रुग्णावर उपचार करीत असताना सुरक्षारक्षक, डॉक्टर व कर्मचाऱ्यानी या चुकीच्या प्रकाराला रोखले नाही.

वायसीएममध्ये रुग्णावर मंत्रांच्या साह्याने उपचार करताना मांत्रिक.

महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात अंधश्रद्धेला खतपाणी घालण्यात येत आहे. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन कायदा असतानादेखील या कायद्याला न जुमानता शासकीय रुग्णालयात अंधश्रद्धा पसरविण्याचे काम खुलेआम सुरु आहे. याची सखोल चौकशी करून या व्यक्तीवर व त्याला पाठीशी घालणाऱ्या प्रशासनावर अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याअंतर्गत कारवाई करावी.

**- संतोष शिंदे, प्रदेश महासचिव, रयत विद्यार्थी विचार मंच**

रुग्णालयामध्ये येणारी व्यक्ती ओपीडीसाठी येत आहे की तंत्रमंत्र करण्यासाठी येत आहे, हे ओळखणे अवघड आहे. मात्र, सीसीटीव्ही तपासून संबंधितावर कारवाईसाठी प्रयत्न करू. सुरक्षारक्षकांना सूचना देतो.

**- डॉ. राजेंद्र वाबळे, अधिष्ठाता, वायसीएम रुग्णालय.**

Hello Pimpri Chinchwad
Page No. 3 Aug 19, 2023
Powered by: erelego.com

दिनांक १९ ऑगस्ट २०२३

शिक्षण | रोजगार | आरोग्य | क्रीडा | कला | महिला सक्षमीकरण

रजि. नं. : महा./१७८६/२०१७/पुणे
F५११६३/पुणे

# रयत विद्यार्थी विचार मंच

(महाराष्ट्र राज्य)


* संस्थापक/अध्यक्ष *
**धम्मराज साळवे**
मो.: ८०८७५४०३८४

* प्रदेश महासचिव *
**संतोष शिंदे**
मो.: ९६०४६८३४५९


जा.क्र:RVVM/2023/175

दिनांक : 17/08/2023

प्रति,

- मा.कुलगुरू
- मा. संचालक,
  परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
  सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**विषय: टी वाय.बी.ए. मार्च-एपिल २०२३ परीक्षेचा रिझल्ट दिसणेबाबत.**

महोदय,

वरील विषयान्वये, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय कला व वाणिज्य तळेगाव दाभाडे या महाविद्यालयातील खालील ३ विद्यार्थिनींचे हॉलतिकीटवर विषय चुकीचे आल्याने Individual Hall ticket correction मधून विषय बदल करून परीक्षेच्या वेळी Emergency Barcode लावण्यात आले होते. रिझल्ट लागल्यानंतर वरील कारणामुळे या विद्यार्थिनींचे रिझल्टमध्ये दिसत नाहीत तरी या विद्यार्थिनींचा रिझल्ट लवकरात लवकर ऑनलाईन व ऑफलाईन मिळावा रिजल्ट लवकर नाही मिळाल्यास विद्यार्थ्यांनींचे १ वर्षाचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते तरी आपण लवकरात लवकर कार्यवाही करावी हि नम्र विनंती..

| Sr. No. | Name of the Student | PRN No. | Seat No. | Old Subject (Subject Code) | Change Subject (Subject Code) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Kaware Pranali Devidas | 1182063088 | 10943 | Heritage Management (36176) | Archaeology (36177) |
| 2 | Ghotkule Shraddha Bharat | 1182063080 | 10942 | Heritage Management (36176) | Archaeology (36177) |
| 3 | Meshram Diksha Sudhakar | 1181992336 | 10959 | Numismatics(36178) | Archaeology (36177) |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
संचालक कार्यालय
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
पोहोच स्वाक्षरी.......
दिनांक 17/08/2023

17/08/2023

Savitribai Phule Pune University Office of the Vice Chancellor Ganeshkhind, Pune-7.

रयत विद्यार्थी विचार मंच रजि. नं. महा/१७८६/२०१७/पुणे महाराष्ट्र राज्य

आपला

संतोष शिंदे
प्रदेश महासचिव


संपर्क कार्यालय : एम.डी.एम. हाईटस्, खराळवाडी, पिंपरी, पुणे – ४११ ०१८.
www.rayatvvm.org 8624866464 rayatvvmanch@gmail.com

**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**
(formerly University of Pune)
GANESHKHIND,PUNE 411007

**Branch/Course:** BACHELOR OF ARTS (2019) - APRIL 2023

**Seat No:** 10959 **Center:** 1443 **Perm Reg No(PRN):** 1181992336

**Student Name:** MESHRAM DIKSHA SUDHAKAR **Mother Name:** SANGITA

